१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार २४ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१११, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 111 Marathi - Daily - Mumbai, 24 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

"बंडखोर खासदारांना खरंच निधी मिळाला नाही का?"

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# फुटीर खासदारांची पूर्ण पोलखोल! मिळालेला निधी खर्चच केलेला नाही

**शिवसेना उबाठात असताना विकासकामांसाठी निधी मिळत नव्हता. त्यामुळे पक्षांतर करण्याशिवाय पर्याय नव्हता, असे कारण सातत्याने पुढे करत उबाठाच्या सहा खासदारांनी बंडखोरी करून शिंदे गटात प्रवेश केला. मात्र, निधी वापराबाबत उघड झालेल्या माहितीवरून या खासदारांचा बुरखा टराटरा फाटला आहे. या सहा खासदारांना मागील दोन वर्षांत मिळालेल्या कोट्यवधींच्या निधीचा त्यांनी जेमतेमही वापर केला नाही आणि विकासाची कामेही केली नाहीत. त्यामुळे निधी पडून आहे. या पोलखोलमुळे आता त्यांना तोंड लपवायला जागा नाही.**



■ मुंबई

**आपण** निधी मिळत नसल्याने उबाठा सोडली, हा त्यांचा दावा म्हणजे बंडखोरीसाठी केलेला निव्वळ कांगावा असल्याचे सिद्ध झाले आहे. खासदारांना त्यांच्या मतदारसंघातील स्थानिक गरजांनुसार रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, आरोग्य सुविधा आदि विकासकामे करण्यासाठी केंद्र सरकारकडून खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत दरवर्षी कोट्यवधीचा निधी दिला जातो. उबाठातून शिवसेनेत गेलेल्या खासदारांनी उबाठातून बाहेर पडण्याचे मुख्य कारण निधीअभावी कामे रखडल्याचे सांगितले होते. धाराशीवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तर सांगितले की, निधी नसल्याने त्यांना साधी ट्रान्सफॉर्मरची कामेही करता येत नव्हती. तर हिंगोलीचे नागेश पाटील-आष्टीकर यांनी निधी मिळत नसल्याने विकासकामे अडली होती, असा दावा केला होता. पण आकडेवारीवरून स्पष्ट दिसते की, त्यांना निधी मिळाला होता. मात्र तो निधी खर्च करून लोकोपयोगी कामे करण्यात त्यांनी रसच दाखवला नाही. मात्र धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांना १८.४७ कोटी रुपये निधी मंजूर झाला होता. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च झाले फक्त १ कोटी ९७ लाख रुपये. म्हणजे १६ कोटी ४९ लाख रुपये निधी शिल्लक आहे. यात त्यांना ट्रान्सफॉर्मरची कामे करता येईनात? त्यांना १३० कामे करायची होती. पण त्यांनी २१ कामे पूर्ण केली आहेत. शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे यांना १४ कोटी ७० लाख रुपये इतका निधी मंजूर होता. त्यांनी ७१ लाख रुपयांचा खर्च पान ७ वर

## आकडेवारी खोटी! फुटीरांचा खुलासा

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना ओमराजे निंबाळकर म्हणाले की, खासदार निधीचा हिशेब मुदत संपण्यापूर्वी करणे चुकीचे आहे. खासदार निधी ५ वर्षांसाठी मिळतो. माझ्या पहिल्या टर्मचा (२०१९ ते २०२४) हिशेब करा. या पाच वर्षांत मला मिळालेल्या खासदार निधीमधला एक पैसाही अखर्चित राहिलेला नाही, याची माहिती कुणीही अधिकृत वेबसाईटवरून काढू शकते. सध्याच्या कार्यकाळाचा हिशेब २०२९ च्या मार्चनंतर करा, तेव्हा जर निधी शिल्लक राहिला तर मला जाब विचारा. नागेश पाटील आष्टीकर यांनीही आपली बाजू मांडताना म्हटले की, मी कार्यकर्त्यांच्या कामासाठीच आणि विकासासाठीच शिवसेनेत गेलो आहे. मला दोन वर्षांत १९ कोटी निधी मंजूर झाला हा आकडा खोटा आहे. खासदाराला पाच कोटी मिळतात. मग दोन वर्षांत १९ कोटी कसे मिळणार? खासदारांना ५ कोटी मिळतात. पण ते कमी आहेत, असे माझे म्हणणे आहे. प्रत्येक गावात गेलो की, तिथले लोक मागणी करतात. मुंबईत कामे झाली नाही तर नगरसेवकाला विचारले जाते. पण इथे लाईट गेली तरी खासदाराला फोन येतो. (निधी किती खर्च केला हा आकडा खोटा आहे असे त्यांचे म्हणणे आहे, पण निधी मिळाला होता हे त्यांना मान्य करावेच लागेल.)

## टेलिग्राम पुन्हा कार्यरत तात्पुरती बंदी हटवली

**नवी दिल्ली -** नीट पुनर्परीक्षेदरम्यान पेपरफुटी रोखण्यासाठी १६ जून ते २२ जून या कालावधीत सरकारने टेलिग्राम ॲपवर घातलेली तात्पुरती बंदी अधिकृतपणे संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता संपूर्ण भारतात टेलिग्रामची सेवा पूर्ववत झाली आहे. कालपासून भारतात 'टेलिग्राम' या मेसेजिंग ॲपची सेवा पुन्हा सुरु झाली असून, आता अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी ते 'गुगल प्ले स्टोअर'वर परत आले आहे. लवकरच ते 'ॲपल ॲप स्टोअर'वरही उपलब्ध होणार आहे. मात्र, ३० जूनपर्यंत मेसेज-एडिटिंग (संदेशात बदल करण्याचे) फिचर बंदच राहणार आहे.

## 'गॉडझिला अल निनो'मुळे भारतात दुष्काळाचा धोका

**न्यूयॉर्क -** 'गॉडझिला अल निनो'मुळे भारतात दुष्काळाचा मोठा धोका निर्माण झाला असून, समुद्राच्या पृष्ठभागारवाली प्रचंड उष्णता जमा झाल्यामुळे मान्सून कमकुवत झाला आहे. गॉडझिला अल निनोबाबत अमेरिकेची अंतराळ संस्था नासाच्या उपग्रहाने विशेष छायाचित्र जारी केले आहेत. २९ वर्षांपूर्वी इतिहासातील सर्वात शक्तिशाली अल निनो तयार झाला होता, ज्याला सुपर किंवा गॉडझिला अल निनो म्हटले गेले. जून २०२६ मध्ये तशीच परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे. नासाच्या 'सेंटिनेल-६ मायकेल फ्रिलिच' उपग्रहाने गोळा केलेल्या माहितीनुसार विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरात समुद्राची पातळी सामान्यपेक्षा वाढली आहे. समुद्रातील हे प्रचंड जल-तरंग इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियाजवळील गरम पाणी पूर्वेकडे दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यांकडे ढकलत आहेत, ज्यामुळे अल निनो तीव्र होत आहे. पॅसिफिक महासागरातील उष्णतेमुळे हवेच्या दाबाचे संतुलन बिघडते. मान्सूनचे बाष्पयुक्त वारे भारताकडे खेचून आणणारी प्रणाली यामुळे कमकुवत होते.

## राम मंदिराची जबाबदारी आता जिल्हाधिकाऱ्यांची



**अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणग्यांमध्ये गैरव्यवहार उघड झाल्यानंतर आता मंदिराच्या व्यवस्थापनात मोठे बदल करण्यात आले आहेत. अयोध्येचे जिल्हाधिकारी शशांक त्रिपाठी यांनी मंदिर व्यवस्थापनाचे कामकाज पाहण्यास सुरुवात केली आहे. या गैरव्यवहाराची चौकशी विशेष तपास पथकाने (एसआयटी) पूर्ण केली आहे. मात्र हे प्रकरण कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेशी संबंधित असल्याने एसआयटीने आपला प्राथमिक अहवाल आज राज्याच्या मुख्य सचिवांना दिला आहे. अंतिम अहवाल १५ दिवसांनी सादर करण्यात येणार आहे.**

■ अयोध्या

**एसआयटीने** चौकशी सुरू केल्यापासून मंदिरात काम करणाऱ्या १,६०० कर्मचाऱ्यांवरील पाळत वाढवण्यात आली आहे. याआधी दानपेटीत येणाऱ्या देणगीच्या नोटांची मोजणी सेवादार टेबल-खुर्चीवर बसून करत होते. मात्र आता जमिनीवर चटई आणि गालिचा अंथरून नोटा मोजल्या जातात. येता-जाता कर्मचाऱ्यांची कसून तपासणी केली जात आहे. त्याचबरोबर दानपेटीतून पैसे काढताना व्हिडिओ चित्रण केले जात आहे. मंदिरात काम करणाऱ्या ४० विश्वासू सेवादारांनाच नोटा मोजण्याचे काम दिले जात आहे. जुने कर्मचारी आणि नोटा मोजण्यासाठी येणाऱ्या बँकेच्या दोन कर्मचाऱ्यांनाही हटवून नवीन लोकांना नियुक्त करण्यात आले आहे. सहा नवीन सीसीटीव्हीदेखील बसवण्यात आले आहेत.

राम मंदिर न्यासाचे सरचिटणीस चंपत राय, सदस्य डॉ. अनिल मिश्रा आणि आमंत्रित सदस्य गोपाल राव यांचे अधिकार गोठवण्यात आले आहेत. ते आता मंदिराच्या दैनंदिन कामांमध्ये सक्रिय नाहीत. मंदिराच्या व्यवस्थेशी संबंधित कोणतेही निर्णय ते घेऊ शकत नाहीत. शशांक त्रिपाठी हे न्यासाचे पदसिद्ध सदस्य आहेत. तेच आता मंदिराचे व्यवस्थापन पाहत आहेत. एसआयटीने या संपूर्ण प्रकरणाचा तपास तीन भागांमध्ये विभागला आहे. ज्यामुळे भविष्यात देणग्या आणि मंदिराच्या मालमत्तेत अपहार होऊ नये. न्यासाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये चंपत राय, डॉ.अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांना एसआयटीच्या अहवालात क्लीनचिट मिळणे कठीण आहे.

### खिसे नसलेले गणवेश

राम मंदिरातील घोटाळा उघडकीस आल्यानंतर आता दानाची मोजणी करणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांसाठी एक नवा नियम लागू करण्यात आला आहे. या कर्मचाऱ्यांना आता खिसे नसलेला गणवेश परिधान करावा लागणार आहे. जेणेकरून चोरीची अजिबात शक्यता राहू नये.

## राज्यभरात पावसाची दमदार हजेरी कोकण किनारपट्टीला यलो अलर्ट

■ मुंबई

**कडक** उन्हामुळे त्रासलेले मुंबईकर काल रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने सुखावले आहेत. राज्यातील इतर भागांतही



मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. मुंबईत आज ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. पुढील ४८ तासांसाठी मुंबईत हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. २४ ते २७ जून दरम्यान कोकण किनारपट्टीसह राज्यातील अंतर्गत भागातील काही प्रदेशात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मुंबईत आज हलक्या सरींना सुरुवात झाली आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, भायखळा, वरळी, मालाड, जोगेश्वरी आणि बोरिवलीसह संपूर्ण शहरात सकाळपासून सुरू होता. त्यामुळे उकाड्यामुळे पान ७ वर

## राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समितीची स्थापना

■ मुंबई

**उत्तराखंड,** गुजरात आणि आसामच्या धर्तीवर राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांची समिती स्थापना करण्यात आली आहे, त्याचा अहवाल आल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल आणि राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रस्ताव तयार होईल, अशी माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत दिली. समान नागरी कायदा लागू करण्यासाठी आपले सरकार शंभर टक्के प्रयत्नशील आहे.

देशात समान नागरी कायदा करणारे भाजपाशासित उत्तराखंड हे पहिले राज्य ठरले आहे. उत्तराखंडमध्ये २७ जानेवारी २०२५ पासून समान नागरी कायदा लागू झाला आहे. वैयक्तिक नागरी बाबींमध्ये एकसमानता आणणे हा या कायद्याचा उद्देश आहे. या कायद्यामुळे जात, धर्म, पंथ किंवा लिंग यांवर आधारित भेदभाव नष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

उत्तराखंडनंतर गुजरात आणि आसाम या दोन भाजपाशासित राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे. गोवा हे एकमेव असे राज्य आहे की ज्या राज्यात पोर्तुगिजांच्या काळापासून समान नागरी कायदा लागू आहे.

आज विधानसभेत नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांचा लक्षवेधी प्रस्ताव होता. पान ७ वर

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त 'महाराजस्व अभियान' राबविणार

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरात २१, २२ आणि २३ जुलै रोजी तीन दिवसीय 'महाराजस्व अभियान' राबविण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या अभियानांतर्गत राज्यातील तब्बल ५० लाख कुटुंबांना थेट शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत सहाही विभागीय आयुक्त, महाराजस्व समाधान शिबिर अभियान राज्यस्तरीय समितीचे राज्य समन्वयक आमदार विक्रांत पाटील, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार प्रज्ञा सातव, आमदार माधवी नाईक, आमदार प्रवीण दरेकर, प्रमोद जठार, श्रीकांत भारतीय, संजय भेंडे, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, हेमंत पाटील, विक्रांत पाटील, अपर मुख्य सचिव विकास खारगे उपस्थित होते.

### महसूल विभागाचा निर्णय

## लोढांना गिरगावात मांसाहार बंद करायचा आहे! मनसेचा आरोप

■ मुंबई

**गिरगाव** चौपाटीवरील कोळी बांधवांच्या बोटींवर झालेल्या कारवाईवरून वाद पेटला आहे. प्रशासनाचा कोळी समाजाला चौपाटीवरून हटवण्याचा प्रयत्न असल्याचे या समाजाचे म्हणणे असून, मंत्री मंगलप्रभात लोढा यांना या भागात मांसाहार बंद करण्याचा आरोप मनसेने केला आहे.

पारंपरिक मासेमारी कमी झाल्यामुळे कोळी बांधवांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गिरगाव चौपाटीवर कोळी बांधवांसाठी मांसाहारी खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्याची मागणी केली की, गिरगाव चौपाटीवरील कोळी बांधवांच्या बोटींवर काही दिवसांपूर्वी शासनाने कारवाई केली होती. शासनाचा



आहे. यासाठी मनसेचे मलबार हिल विभाग अध्यक्ष दिनेश पुंडे यांनी महापालिकेच्या 'डी' वॉर्ड सहाय्यक आयुक्तांना पत्र लिहिले आहे. ते म्हणाले कोळी समाजाला गिरगाव चौपाटीवरून हद्दपार करायचा डाव आहे. भाजपा सरकार आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांना विभागात पान ७ वर

## व्हिस्कीसाठी 'गॉडफादर' नाव वापरू नका संजय दत्तच्या कंपनीला न्यायालयाची मनाई

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने सोमवारी अभिनेते संजय दत्त यांच्या पाठिंब्याने चालणाऱ्या कार्टेल ब्रदर्स या कंपनीला व्हिस्कीसाठी 'गॉडफादर' हा ट्रेडमार्क वापरण्यास अंतरिम बंदी घातली. न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांनी देवन्स मॉडर्न ब्रुअरीज यांनी दाखल केलेली अंतरिम स्थगितीची याचिका मंजूर केली.

न्यायालयाने आदेशात म्हटले की, खटल्याचा निकाल लागेपर्यंत कार्टेल ब्रदर्स, त्यांचे भागीदार, संचालक आणि त्यांच्या वतीने काम करणाऱ्या इतर कोणालाही 'गॉडफादर', गॉडफादर्स किंवा तत्सम नाव, लेबल, पॅकेजिंग, ट्रेड ड्रेस अथवा प्रतिनिधित्व वापरून व्हिस्कीचे उत्पादन, बॉटलिंग, विपणन, विक्री, जाहिरात किंवा निर्यात करता येणार नाही. देवन्स मॉडर्न ब्रुअरीजने कंपनीचा असा दावा आहे की, ती १९८४ पासून 'गॉडफादर' या ट्रेडमार्कची मालक असून, बीअर तसेच व्हिस्की आणि रमसाठीही तिची नोंदणी आहे. गेल्या चार दशकांत या ब्रँडने मोठी प्रतिष्ठा आणि ग्राहकांचा विश्वास मिळवला असून, तो त्यांच्या उत्पादनांशी जोडला गेला आहे.

देवन्स कंपनीने न्यायालयात असा युक्तिवाद केला की 'गॉडफादर' हा स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण ट्रेडमार्क असल्याने त्याला मजबूत कायदेशीर संरक्षण मिळायला हवे. तसेच कार्टेल ब्रदर्सने व्हिस्कीसाठी हे नाव वापरल्यास ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो.

## राहुल गांधींच्या स्कूबा डायव्हिंगवर ५२ कोटींचा खर्च! भाजपाचा आरोप

**काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या अंदमान-निकोबार दौऱ्यातील स्कूबा डायव्हिंगवर ५२ कोटी रुपयांचा खर्च झाल्याचा आरोप भाजपा नेते व केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी केला. मात्र, या आरोपांवर काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया देत तो दावा फेटाळून लावला आहे.**

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** खासदार राहुल गांधी यांनी २६ ते २८ एप्रिलदरम्यान अंदमान आणि निकोबार बेटांचा दौरा केला



होता. या दौऱ्यात त्यांनी स्कूबा डायव्हिंग केले होते. याचा सुमारे १६ मिनिटांचा व्हिडिओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला होता. यावरून केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आरोप केला की, राहुल गांधी यांच्या या स्कूबा डायव्हिंगसाठी सुमारे २६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या डायव्हिंगला सागरी जीवन आणि पर्यावरणाशी जोडून मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला.

या विधानानंतर काँग्रेसकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. काँग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी रिजिजू यांच्या वक्तव्यावर टीका करत म्हटले की, रिजिजू यांनी जणू 'मानहानी मंत्री'ची भूमिका स्वीकारली आहे.

## कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्याने तेल कंपन्या नफ्यात

■ नवी दिल्ली

**जागतिक** संकटाच्या काळात, वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे तेल कंपन्यांचा किरकोळ नफा कमी झाला होता. आता, कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्याने आणि किरकोळ किमतींमध्ये कोणताही बदल न झाल्याने, कंपन्यांचा प्रति लिटर नफा आणखी चांगल्या पातळीवर सुधारला आहे.या सुधारणेमुळे इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम व हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या प्रमुख देशांतर्गत तेल कंपन्यांच्या आर्थिक स्थितीला आणि तिमाही निकालांना मोठी चालना मिळेल.

एका अहवालानुसार, सरकारी मालकीच्या तेल विपणन कंपन्यांची नफाक्षमता सुधारणार आहे. कच्च्या तेलाच्या घसरत्या किमतींमुळे इंधन विपणन मार्जिनला चालना मिळत आहे. वाढते कर्ज व इंधन करांसंदर्भातील अनिश्चितता या क्षेत्राच्या दीर्घकालीन कमाईच्या शक्यतांना मर्यादित करू शकते. अहवालात म्हटले आहे की, सरकारी मालकीच्या रिफायनरी आणि इंधन विक्रेत्यांच्या पेट्रोल व डिझेल विक्रीवरील एकत्रित मार्जिन आता मध्य-पूर्व संघर्षापूर्वीच्या पातळीपेक्षा जास्त आहे.

## मराठी भाषा निधनाचाच शोकप्रस्ताव राज ठाकरे नार्वेकरांवर संतापले

■ मुंबई

**पद्मविभूषण** गायिका आशा भोसले यांच्या मृत्यूचा शोकप्रस्ताव काल विधिमंडळ अधिवेशनात विधानसभेत मांडण्यात आला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा प्रस्ताव वाचून दाखवला. पण शोकप्रस्ताव वाचताना झालेल्या चुकीच्या उच्चारांवरून आणि उल्लेखांवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक्स पोस्ट करत नाराजी व्यक्त केली. काल नार्वेकरांनी आशाताईंच्या निधनाचा नाही तर मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला अशा शब्दात राज ठाकरेंनी नार्वेकरांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात संताप व्यक्त केला आहे.



राज ठाकरे पोस्टमध्ये म्हणाले की, आशाताई भोसलेंच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडताना, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्या पद्धतीने मराठी भाषेची चिरफाड केली. वाचण्याआधी त्या कागदातून भेळ खाल्ली होती का यांनी? नार्वेकरांनी हा प्रस्ताव स्वाहिली अथवा हिब्रू भाषेत मांडला असता तरी चालले असते. अजून एक शोकांतिका म्हणजे नार्वेकर, दीनानाथ मंगेशकरांचा उल्लेख दीनदयाल मंगेशकर करत होते आणि वाट्टेल तसे मराठी वाचून दाखवत होते त्यावेळेस सभागृहात उपस्थित एकाही आमदाराला आक्षेप नोंदवावासा वाटला नाही. भाजपाने जी काही खोगीरभरती सुरू केली आहे त्यात त्यांची पान ७ वर

# दुसऱ्या दिवशी मविआ आमदारांचे पायऱ्यांवर महागाईविरोधात आंदोलन

■ मुंबई




**पावसाळी** अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान भवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय संघर्ष तीव्र झाल्याचे चित्र होते. वाढती महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

महागाईमुक्त देश, भाजपामुक्त भारत असे फलक हातात फलक घेऊन आंदोलन करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्य व केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली.देशात महागाई मोठ्या प्रमाणात वाढली असून ती नियंत्रणात आणण्यात भाजपा सरकार अपयशी ठरल्याचा आरोप आंदोलक आमदारांनी केला.

# राज्यात एकही दिवस लोडशेडिंग नाही! मुख्यमंत्री फडणवीसांचा दावा



■ मुंबई

**राज्यात** वीजटंचाई आणि लोडशेडिंगबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत खुलासा केला. काही औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते आणि काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या होत्या. मात्र, या सर्व परिस्थितीत राज्यात एकही दिवस अधिकृत भारनियमन (लोडशेडिंग) करण्यात आलेले नाही, असा दावा त्यांनी केला.

पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले यांनी सभागृहात वीजपुरवठ्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, कोराडी येथील ६६० मेगावॉट क्षमतेचा संच काही दिवस तांत्रिक कारणांमुळे बंद होता. त्याचप्रमाणे नाशिकसह इतर काही वीजनिर्मिती संचांमध्येही दोन ते तीन दिवस तांत्रिक बिघाड झाला होता. १२ ते १३ जून आणि १७ ते १९ जूनदरम्यान काही संच बंद होते. मात्र, त्याचा राज्यातील वीजपुरवठ्यावर परिणाम होऊ दिला नाही. सरकारने यासाठी आधीच पर्यायी व्यवस्था तयार ठेवली होती. मिड-टर्म पॉवर पर्चेस करारांद्वारे बंद पडलेल्या संचांच्या जागी आवश्यक वीज बाजारातून खरेदी करण्यात आली. याशिवाय कोयना जलविद्युत प्रकल्पातील महानिर्मितीच्या वाट्याचा उपलब्ध अतिरिक्त कोटा वापरून अतिरिक्त वीजनिर्मिती केली. त्यामुळे राज्यातील ग्राहकांना वीजटंचाईचा सामना करावा लागला नाही. या संपूर्ण कालावधीत महाराष्ट्रात एकाही दिवशी नियोजित लोडशेडिंग करण्यात आलेले नाही. काही तांत्रिक अडचणी होत्या, मात्र त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. राज्यात लोडशेडिंग सुरू असल्याचा दावा वस्तुस्थितीशी सुसंगत नाही. राज्यात मोठ्या प्रमाणावर फीडर सेपरेशन योजना राबविण्यात आली आहे.

# विधान परिषदेत नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी

■ मुंबई

**महाराष्ट्र** विधान परिषदेच्या नव्याने निवडून आलेल्या १७ सदस्यांनी आज विधान भवनात आमदारकीची शपथ घेतली. हा शपथविधी सोहळा विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला.

या शपथविधी सोहळ्यात प्राजक्त तनपुरे, रवींद्र फाटक, अनिकेत तटकरे, दुष्यन्त चतुर्वेदी, विक्रम काकडे, अरुण लखानी, बसवराज पाटील, प्रवीण पोटे, अमरनाथ राजुलकर, राजेंद्र राऊत, धैर्यशील कदम आणि गोकुळ गीते यांच्यासह अन्य सदस्यांनी शपथ घेतली. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला टीम इंडियाचा फलंदाज तिलक वर्मा हेदेखील उपस्थित होता. तो खास राष्ट्रवादी काँग्रेसचे बिनविरोध निवडून आलेले आमदार विक्रम काकडे यांच्या शपथविधीसाठी मुंबईत आला होता. पुण्याचे विक्रम काकडे आणि तिलक वर्मा यांची अनेक वर्षांपासून मैत्री आहे. शपथविधीनंतर सभागृहातील सदस्यांनी नव्या आमदारांचे स्वागत केले.

# ड्रग रॅकेटमध्ये पोलीस सहभागी जयंत पाटील, आव्हाडांचा आरोप



■ मुंबई

**विधिमंडळाच्या** पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सभागृहात अमली पदार्थांच्या तस्करीवरून जोरदार चर्चा झाली. यावेळी विरोधकांनी पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत थेट संगनमताचे आरोप केले. शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी आरोप केला की, पोलीस मोठ्या प्रमाणात हस्तेखोरी करत आहेत. अशा पोलिसांवर थेट कारवाई झाली पाहिजे. राज्यात ऑनलाईन पद्धतीनेही ड्रग पुरवले जात आहेत. तसेच आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ड्रगविषयी आपण वारंवार सभागृहात चर्चा करतो. पण ज्या ठिकाणी ड्रग्ज विक्री होते, त्याची माहिती पोलिसांना दिली तरी कारवाई होत नाही, असा आरोप केला.

या आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, गेल्या चार महिन्यांत राज्यात २५४.५३ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी १,१४२ गुन्हे नोंदवण्यात आले असून १,६२६ आरोपींना अटक केली आहे. अंमली पदार्थ सेवनाविरोधात ३,१९९ गुन्हे दाखल केले आहेत. मुंबईसह राज्यभरात अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्सची सात युनिट कार्यरत असून २०२५ मध्ये अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्स आणि पोलिसांनी मिळून ५२३.१७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट केले. ड्रग तस्करी आणि विक्रीबाबत राज्य सरकारचे 'झिरो टॉलरन्स' धोरण आहे. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जात आहे.




# भोंदू खरातवर १७ गुन्हे दाखल १२ प्रकरणे एसआयटीकडे



■ मुंबई

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरातविरोधात एकूण १७ गुन्हे दाखल असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लेखी उत्तराद्वारे दिली. यापैकी १२ गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) वर्ग करण्यात आला असून, ८ गुन्ह्यांचा तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले आहे.

फडणवीस म्हणाले की, अशोक खरातविरुद्ध नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत लैंगिक छळ, जमीन बळकावणे, आर्थिक गैरव्यवहार तसेच जादूटोण्याच्या नावाखाली फसवणूक केल्याप्रकरणी एकूण १७ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील १२ गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) वर्ग करण्यात आला असून, महिलांवरील लैंगिक अत्याचाराशी संबंधित ८ गुन्ह्यांचा तपास पूर्ण करून संबंधित न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ४ आर्थिक फसवणुकीशी संबंधित गुन्ह्यांचा तपास सध्या सुरू आहे. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३ राज्यात लागू आहे. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विभागीय आणि जिल्हास्तरावर जनजागृती व अंमलबजावणी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

# १७ महिन्यांत १०,५०५ सायबर गुन्हे ! २,३७९ आरोपी अटकेत

■ मुंबई




**राज्यातील** वाढत्या सायबर गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर विधानसभेत उपस्थित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धक्कादायक आकडेवारी जाहीर केली. राज्यात सन २०२५ ते मे २०२६ या कालावधीत सायबर आर्थिक फसवणुकीचे एकूण १० हजार ५०५ गुन्हे नोंदविण्यात आले असून, या प्रकरणांमध्ये २ हजार ३७९ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

लेखी उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, डिजिटल अटक, शेअर ट्रेडिंग, हॉटेल रेटिंग, बनावट पीडीएफ फाईल्स आणि विविध ऑनलाईन माध्यमांद्वारे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात २०२५ मध्ये अशा प्रकारच्या ५,१४१ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यामध्ये तब्बल ३७.७६ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे आढळून आले आहे. यापैकी ७.०२ कोटी रुपयांची रक्कम गोठविण्यात (होल्ड) आली आहे.

कोपरगाव येथे एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला डिजिटल अटक दाखवून ८७.३० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे उघड झाले. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून दोषारोपपत्रही दाखल करण्यात आले आहे. फसवणुकीतील ७८.६३ लाख रुपयांपैकी ४२.१८ लाख रुपये न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीला परत करण्यात आले आहेत.

# नाशिक टीसीएस प्रकरणात ९ गुन्हे दाखल! ८ आरोपी अटकेत

■ मुंबई

**नाशिकमधील** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टिसीएस) या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांवरील अत्याचार प्रकरणी विधानसभेत आज प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिक शहरातील संबंधित कंपनीत कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न तसेच धार्मिक भावना दुखावल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणात ८ महिला आणि १ पुरुष

**तपास विशेष पथकाकडे सोपविण्यात आला**

यांनी पुढे येऊन तक्रारी दिल्यानंतर पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ते पुढे म्हणाले की, या प्रकरणात ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, पीडित महिला कर्मचाऱ्याने पुणे येथील कंपनीच्या मुख्य कार्यालयातील ऑपरेशन मॅनेजरकडे तोंडी तक्रार करूनही दुर्लक्ष करण्यात आल्याचे आढळून आले. त्यामुळे संबंधित ऑपरेशन मॅनेजरलाही आरोपी करून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी देवळाली कॅम्प आणि मुंबईनाका पोलीस ठाण्यात दाखल सर्व ९ गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला आहे.

# कतारमधील गॅस प्रकल्पातील स्फोटात १३ भारतीयांचा मृत्यू! ६६ जण जखमी

■ दोहा

**कतारमधील** रास लाफान द्रवीकृत नैसर्गिक वायू एलएनजी संकुलात रविवारी झालेल्या भीषण स्फोटात १३ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी कतारमधील भारतीय दूतावासाने सोमवारी केली.

भारतीय दूतावासाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, रास लाफान दुर्घटनेत १३ भारतीय नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची कतारी अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती आम्ही सखोल संवेदना व्यक्त करतो आणि दिवंगत आत्म्यांच्या शांतीसाठी



प्रार्थना करतो. कतारचे ऊर्जा मंत्री 'साद अल-काबी' यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, या स्फोटात एकूण १३ जणांचा मृत्यू झाला असून, ६६ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये भारतीय आणि पाकिस्तानी नागरिकांचा समावेश आहे. हा स्फोट प्रकल्पातील कामकाज पुन्हा सुरू करण्याच्या प्रक्रियेदरम्यान झाला. मार्च महिन्यात झालेल्या इराणी हल्ल्यानंतर हे कामकाज तात्पुरते बंद करण्यात आले होते. ६६ जखमींवर उपचार सुरू असून त्यापैकी कोणाचीही प्रकृती चिंताजनक नाही. अधिकाऱ्यांनी या घटनेला तांत्रिक अपघात असे संबोधले आहे.

# भाजपा नगरसेवकाने वैयक्तिक टीका केली उपायुक्त अर्चना दिवे भर महासभेत रडल्या

■ विरार

**वसई**-विरार महापालिकेच्या महासभेत भाजपा नगरसेवकांनी वैयक्तिक टिप्पणी केल्याने दुखावलेल्या घनकचरा विभागाच्या उपायुक्ता अर्चना दिवे भर सभागृहात रडल्या.

सोमवारी वसई-विरार महापालिकेची महासभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा उशीरापर्यंत चालली. सभा संपत असताना भाजपा नगरसेवक गणेश पाटील यांनी नालेसफाईबाबत प्रश्न उपस्थित केले होते. पालिकेकडून माहिती देताना तांत्रिक घोळ झाला होता. त्यावर भाजपा नगरसेवकांनी घनकचरा विभागातील कामावरून उपायुक्त अर्चना दिवे यांना लक्ष्य केले. गटनेते अशोक शेळके यांनी त्यांच्या आडनावावरून टीका केली.

या टिकेमुळे दुखावल्या गेलेल्या उपायुक्त दिवे यांना अश्रू अनावर झाले आणि थेट सभागृहातच त्या ढसाढसा रडल्या. आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी यावर कडक शब्दांत भाजपा नगरसेवकांना सुनावले.

# जुलै महिन्यात अपेक्षित पाऊस न पडल्यास मुंबईत कृत्रिम पाऊस

**अतिरिक्त आयुक्त बांगर यांचे संकेत**

■ मुंबई

**सध्याच्या** मुंबईतील मान्सूनच्या परिस्थितीवर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी स्पष्ट केले आहे की, मुंबईत सध्या धरणांमध्ये ८.५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून तो २० ऑगस्टपर्यंत पुरेल. जर जुलै महिन्यात अपेक्षित पाऊस पडला नाही, तर परिस्थिती हाताळण्यासाठी पालिकेकडून कृत्रिम पावसासह पर्याय विचाराधीन आहेत.

अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले की,सध्याच्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पालिकेने विशेष नियोजन केले आहे. आधीच लागू असलेल्या १० टक्के पाणीकपातीव्यतिरिक्त, जुलैमध्ये परिस्थिती न सुधारल्यास आणखी १० टक्के कपातीची शक्यता आहे. तसेच टँकरच्या फेऱ्यांवर आळा घालणे, विहिरींचे पुनर्भरण करणे आणि शोष खड्डे तयार करण्यावर भर दिला जाईल.सर्व इमारतींचे ऑडीट करून रेन वॉटर हार्वेस्टिंगवर भर देण्याचा प्रयत्न आहे. तलावांमधील पाणीसाठ्यावर आणि हवामानाचा अंदाज यावर पालिका बारीक लक्ष ठेवून आहे. वास्तविक,जून महिन्यात ४०० मिमी पाण्याची नोंद होत असते.मात्र,जून महिना संपत आला असून, जुलै महिन्यात २०२५ मध्ये कुलाबा येथे ३७४.६ तर सांताक्रूझ येथे ७८६.४ मिमी पावसाची नोंद झाली होती.

# आता मीरा-भाईंदर महापालिका 'शाळा दत्तक योजना' राबविणार

■ मीरा रोड

**मीरा-भाईंदर** महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आधुनिक व डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'शाळा दत्तक योजना' राबवली जात आहे. या अंतर्गत खासगी शिक्षण संस्था व मनपा यांच्यात समन्वय साधून शाळांचा सर्वांगीण विकास केला जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर महापौर डिंपल विनोद मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील विविध खासगी शाळांचे ट्रस्टी, संस्थापक आणि प्रतिनिधी यांच्यासोबत या योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मीरा-भाईंदर महापालिका शाळा विद्यार्थी-केंद्रित बनविण्यासाठी अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. शाळा दत्तक योजनेमुळे शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही पाण्यासाठी कोर्टात यावे लागते

**कोर्टाने सरकारला फटकारले**

■ मुंबई

**देशाला** स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांपेक्षा जास्त काळ उलटल्यानंतरही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी न्यायालयात धाव घ्यावी लागत आहे, अशा शब्दांत तीव्र नाराजीचा सूर आळवत उच्च न्यायालयाने राज्य सरकारला चांगलेच फटकारले. मेळघाटसह राज्यातील इतर भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची असलेली तीव्र टंचाई लक्षात घेत न्यायालयाने सरकारला राज्यासाठी ठोस व कालबद्ध आराखडा सादर करण्याचे आदेश दिले.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट आणि इतर आदिवासी भागातील कुपोषण, बालमृत्यू व गर्भवती महिलांच्या आरोग्यासंदर्भातील जनहित याचिकांवर न्या. अजय गडकरी आणि न्या. कमल खाटा यांच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. यावेळी खंडपीठाने सरकारची कानउघाडणी केली. पाणी देणे हा उपकार नाही, तर नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, असे खंडपीठाने सरकारला सुनावले. सुनावणीवेळी सरकारी वकिलांनी टंचाईग्रस्त भागात टँकर्स तयार ठेवण्यात आल्याची माहिती दिली. नागरिकांकडून मागणी येताच टँकर्सद्वारे पाणी पुरवले जाते, असे सरकारी वकिलांनी सांगताच न्यायालय संतप्त झाले.

# विष्णू चाटेचा जामीन अर्ज फेटाळला

**बीड-** जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायालयाने आरोपी विष्णू चाटे याचा जामीन अर्ज फेटाळला. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींना दिलासा मिळालेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ जून रोजी होणार आहे. आजच्या सुनावणीवेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने विष्णू चाटेचा जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे याच्या जामीन अर्जावरही दोन्ही बाजूंकडून युक्तिवाद पूर्ण झाला. न्यायालयाने त्यावरील निर्णय अद्याप राखून ठेवला आहे. इतर काही अर्जांवरील आदेशही प्रलंबित आहेत.

# मिलिंद नार्वेकरांसोबतच्या वादानंतर भास्कर जाधवांचे स्टेटस चर्चेत

**मुंबई- उबाठाचे** आमदार भास्कर जाधव यांनी व्हॉट्सअ‍ॅपवर ठेवलेल्या 'चापलूसों की जमात' या स्टेटसमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. पक्षाचे सचिव आणि आमदार मिलिंद नार्वेकर यांच्यासोबत झालेल्या अलीकडील शाब्दिक वादाच्या पार्श्वभूमीवर या स्टेटसकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. भास्कर जाधव यांनी आपल्या स्टेटसमध्ये, 'चापलूसों की जमात में सीधे खड़े आदमी पर भी, अकड़ने की तोहमत लग जाती है' असे लिहिले आहे.

# 'मायक्रोसॉफ्ट'च्या नव्या फीचरमुळे कर्मचाऱ्यांचे ठिकाण बॉसला कळणार

■ नवी दिल्ली

**मायक्रोसॉफ्टने** मायक्रोसॉफ्ट टीम्स आणि मायक्रोसॉफ्ट प्लेसेससाठी 'वर्कप्लेस चेक-इन व्हाया वाय-फाय' हे फिचर आणणार आहे. या फीचरमुळे कर्मचाऱ्यांचे ठिकाण त्यांच्या बॉसला कळवणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे. मायक्रोसॉफ्टचा दावा आहे की, हे साधन कर्मचाऱ्यांवर पाळत ठेवण्यासाठी नाही, तर हायब्रिड कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांचा समन्वय साधण्यासाठी आहे. हे फिचर कर्मचारी कार्यालयाच्या वाय-फायशी कनेक्ट होतातच त्यांची उपस्थिती आणि कामाचे ठिकाण स्वयंचलितपणे अपडेट करेल. त्यामुळे कार्यालयात कोण उपस्थित आहे, हे समजेल. कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सवर चिंता व्यक्त केली की, हे फीचर कर्मचाऱ्यांच्या गोपनीयतेचे उल्लंघन ठरू शकते आणि कर्मचाऱ्यांना सतत देखरेख ठेवल्यासारखे वाटू शकते.




# श्रीवर्धनचे उबाठा नगराध्यक्ष अतुल चौगुले शिंदे सेनेत प्रवेश करणार

■ श्रीवर्धन

**राज्यात** 'ऑपरेशन टायगर' सुरू असतानाच आता उबाठाचे श्रीवर्धन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अतुल अरविंद चौगुले हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

अतुल चौगुले हे रायगड जिल्ह्यातील उबाठाचे महत्त्वाचे नेते मानले जातात. त्यामुळे त्यांच्या संभाव्य पक्षांतरामुळे उबाठासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या नगरपालिका निवडणुकीत अतुल चौगुले यांनी 'मशाल' चिन्हावर उल्लेखनीय विजय मिळवत श्रीवर्धनमध्ये मोठा राजकीय उलटफेर केला होता. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आणि खासदार सुनील तटकरे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे जितेंद्र सातनाक यांचा पराभव करून नगराध्यक्षपद पटकावले होते. हा विजय राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला गेला होता. विशेष म्हणजे, हा मतदारसंघ राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रभावक्षेत्रात येत असल्याने चौगुले यांच्या विजयाची राज्यभर चर्चा झाली होती.

# भाजपा आमदारांसाठी आता बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक

**प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा निर्णय**

■ मुंबई

**राज्य** विधिमंडळात भाजपा आमदारांची संख्या सर्वाधिक असली, तरी सभागृहातील उपस्थितीबाबत पक्षाने गंभीर दखल घेतली आहे. यापुढे आमदारांना पारंपरिक सहीऐवजी बायोमेट्रिक हजेरी लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी हा निर्णय घेतला आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी झालेल्या बैठकीत आमदारांच्या उपस्थितीचा आढावा घेण्यात आला. अनेक आमदार पूर्णवेळ सभागृहात उपस्थित राहत नसल्याचे लक्षात आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. या नव्या प्रणालीमुळे अधिवेशनादरम्यान केवळ सही न करता बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवावी लागणार आहे. प्रत्येक आमदार आणि मंत्री सभागृहातील कामकाजात किती वेळ सहभागी झाला, याची अचूक नोंद ठेवली जाणार आहे. विविध विधेयके तसेच शेतकरी कर्जमाफीसारख्या महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेदरम्यान होणारी गैरहजेरी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आमदारांनी अधिक वेळ सभागृहात राहून सक्रिय सहभाग नोंदवावा, हा यामागील उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मागील अधिवेशनांमध्ये काही आमदार केवळ आपल्या विषयापुरतेच उपस्थित राहत असल्याचे दिसून आले होते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अखेर आनंदघनाचे आगमन झाले!

गेल्या दोन-चार दिवसांत महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये पावसाचे झालेले आगमन म्हणजे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंदाचे उधाण होते. हा पाऊस म्हणजे आनंदवर्षावच म्हणावा लागतो. कारण ज्याची अतिशय मनापासून प्रतीक्षा होती असा हा पाऊस अखेर दाखल झाला आणि त्याच्या आगमनाने आता पुढचा संपूर्ण पावसाळा अधिक सुखरूप जाईल अशा प्रकारचे आश्वासन ही प्रत्येकाला मिळालेले आहे. हा देखील निसर्गाचाच चमत्कार म्हणावा लागतो. पाऊस येत नव्हता म्हणून कासावीस झालेलं हे जनमानस आज पावसाच्याच या पहिल्या सरींनी इतकं आनंदून गेलं की, त्याला निसर्गाच्या या अचाट शक्तीचा चमत्कार अनुभवता आला आणि साक्षात्कारही समजून घेता आला. पाऊस हा निसर्गचक्राचा केवळ एक भाग नाही तर तो संपूर्ण जीवसृष्टीचा प्राण आहे. तो ज्यावेळेला रुसतो किंवा जेव्हा वेळेवर पाऊस नसतो त्यावेळेला एकूणच जीवसृष्टीची होणारी घालमेल प्रत्येकजण अनुभवतो. म्हणूनच पावसाचे हे पहिले आगमन म्हणजे आनंदघनाचे मनोमन केलेले स्वागत ठरते. जर पाऊस आणखीन केवळ आठ-दहा दिवस जरी लांबला असता तरी संपूर्ण राज्यातील पाण्याची अवस्था अधिक बिकट झाली असती. पाण्याच्या बरोबरीने इतर अनेक क्षेत्रांवरही त्याचे गंभीर परिणाम पाहायला मिळाले असते. कारण यापूर्वीचे चित्र-विचित्र दुष्काळ भारताने अनुभवलेले आहेत आणि दुष्काळाचा भयंकर परिणाम काय असतो याची देखील तीव्र जाणीव प्रत्येक नागरिकाला असते. किंबहुना या पावसाच्या अनुपस्थितीमुळे संपूर्ण जीवसृष्टीची किती प्रचंड हानी होते याची सुद्धा प्रत्येकाला कल्पना आहे. म्हणूनच पावसाची करुणा भाकत असताना तो अपेक्षेप्रमाणे बरसत राहावा आणि सगळ्या जीवसृष्टीला तो जीवनदान देत राहावा अशीच त्याच्याकडे प्रत्येकजण प्रार्थना करत असतो.

### जीवसृष्टीचे वरदान

पावसाचं हे येणं खरोखरच आनंदाचं दान देणारं असतं यात काही शंका नाही. जून महिना संपत आला आणि पाऊस येण्याची जेव्हा चिन्ह दिसत नव्हती त्यावेळेला लोकांच्या मनावर आलेला ताण आणि चेहऱ्यावर दिसणारी उदासीनता स्पष्टपणे जाणवत होती. आता सर्व दूर झालेल्या या पावसाच्या आगमनाने सर्वांनाच मोठा दिलासा मिळालेला आहे. अर्थातच येणाऱ्या काळामध्ये पाऊस कसा आणि किती पडेल हे पुन्हा त्या निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. परंतु बदलत्या काळाचा विचार केला तर पावसाचा प्रत्येक थेंब हा साठवता येणं, येणाऱ्या काळाची गरज ठरणार आहे. दुर्दैवाने राज्यात पाण्याची टंचाई प्रचंड प्रमाणात भासत आहे. उन्हाळ्यापूर्वीच म्हणजे हिवाळा संपल्या संपल्या अनेक शहरांमधून, गावामधून पाण्याचा तुटवडा निर्माण होतो आणि पुरेसे शुद्ध पाणी उपलब्ध होत नाही. कारण आपल्याकडे जलसिंचनाला प्राधान्य दिले गेलेले नाही. प्रत्येक वर्षा ऋतूमध्ये प्रचंड पाऊस पडत असतो. नदी-नाल्यांना पूर येतात, महापूर येतात, जलसाठे ओसंडून वाहू लागतात. शहरांमध्ये, गावांमध्ये पडणाऱ्या पावसाचे पाणी चारही दिशांना वाहून जाते. परंतु ते साठवण्याची कोणतीही शास्त्रशुद्ध व्यवस्था अजूनही अंमलात आलेली नाही. आज महाराष्ट्रातला विचार केला तर फक्त १८% जमीन ही ओलिताखाली आलेली आहे. अजूनही लाखो एकर जमीन ही ओलिताखाली आणता येऊ शकते. त्यासाठी जलसिंचनाच्या व्यापक योजना राबविता येऊ शकतात. शेजारच्या गुजरातने नर्मदा प्रकल्प पूर्ण केला आणि राज्याच्या एका मोठ्या भागाची पाण्याची कायमची समस्या दूर केली. महाराष्ट्राला गोदावरी, कृष्णा, कोयना यासारख्या कितीतरी मोठ्या नद्या लाभल्या आहेत. परंतु महाराष्ट्रात एकाही ठिकाणी या नद्यांचे पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अगदी पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक जलसिंचन झालेले असले तरीसुद्धा उन्हाळ्यामध्ये या सर्व ठिकाणी पाणीटंचाई तीव्रपणे जाणवत असते. दुष्काळसदृश परिस्थिती तिथे पाहायला मिळते. टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येते. यावर्षी तर पुण्यासारख्या महानगरामध्ये एक दिवसाआड पाणी देण्याची वेळ आली. यावरून जलसिंचन हे महाराष्ट्रामध्ये किती अक्षम्यपणे दुर्लक्षित झालेले आहे हेच त्यातून स्पष्ट होते.

### पावसाचा थेंब न थेंब महत्त्वाचा


केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता पावसाने पावसाळ्यात कोसळणाऱ्या या पाण्याचा अधिकाधिक वापर करून घेणं किंवा त्या पाण्याचे जलपुनर्भरण करणं, विविध ठिकाणी पाणी साठवण्याच्या नवनवीन व्यवस्था निर्माण करणं हे देखील तितकंच आवश्यक झालेलं आहे. पाऊस आला नाही तर काय अवस्था होते किंवा पाऊस थोडा जरी उशिरा आला तरी सगळ्यांची कशी पाचावर धारण बसते हे प्रत्येक जण अनुभवत असतो. सरकारी यंत्रणांना त्याची तीव्रताही जाणवत असते. परंतु पावसाळा सुरू झाल्यानंतर 'पुन्हा येरे माझ्या मागल्या' सुरू होते आणि हे पाणी साठवण्यासंदर्भात कोणत्याही ठोस योजना अंमलात येत नाहीत. खरे तर आज महाराष्ट्राला अधिकाधिक धरणांची आणि पाटबंधारे यांची आवश्यकता आहे. जलयुक्त शिवारसारख्या योजना राबवल्या गेल्या. पण त्या सुद्धा अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालेल्या नाहीत. शेजारचा मध्य प्रदेशमध्ये आता प्रत्येक सोसायटीमध्ये पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण करण्यासाठी एक आगळीवेगळी संकल्पना राबवली जात आहे आणि त्या माध्यमातून जमिनीतला जलस्तर कसा वाढेल असा दूरगामी विचार करून योजना अंमलात आणली जात आहे. अगदी लोकांकडून प्रत्येकी हजार रुपयाची वर्गणी घेऊन सरकारतर्फे या योजना राबवल्या जात आहेत. अशा योजनांची माहिती घेऊन महाराष्ट्रातसुद्धा पाणी साठवण्याच्या आगळ्यावेगळ्या आणि नवनवीन कल्पना राबवणे तितकेच गरजेचे झालेले आहे. पाऊस येईल, पाऊस पुरेशा प्रमाणात होईल. परंतु तो आहे तसा वाहून जाईल आणि मग दरवर्षी उन्हाळ्याच्या आधीच पुन्हा एकदा पाण्याच्या प्रतीक्षेसाठी वणवण फिरण्याची वेळ येईल हे विसरून चालणार नाही.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

लोक आपल्याला कसं पाहतात यापेक्षा आपण स्वतःकडे कोणत्या नजरेने पाहतो ह्यावर आपलं भविष्य आणि संपूर्ण आयुष्य अवलंबून असतं. कारण तुम्ही जसे स्वतःला पाहता तसेच बनत जाता.

**पंचांग**



रवी उदय- ०६-२४
रवी अस्त- १९-१८

**बुधवार, २४ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल दशमी**
**नक्षत्र : चित्रा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ००-५२ कन्या**
**००-५३ ते २४-०० तूळ**

**याज्ञवल्क्य जयंती, गायत्री जयंती, पक्षाघात निवारण दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)





## बिहारी मस्टर्ड-गार्लिक फिश करी



★**साहित्य:** मासे- ५०० ग्रॅम, मोहरीचे तेल ३ चमचे, पिवळी मोहरी २ चमचे, काळी मोहरी (राई) १ चमचे, लसूण पाकळ्या १५-२० (बिहारी फिश करीमध्ये थोडे अधिक लसूण वापरला जातो), जिरा- अर्धा चमचा, काळी मिरी- ३-४, अख्खे धणे- अर्धा चमचा, सुकी लाल मिरची- २, पंचफोरन (जीरा, राई, मेथीदाणे, बडीशेप, कलौंजी): अर्धा टीस्पून (टेम्परिंगसाठी) हळद पावडर- अर्धा टीस्पून लाल तिखट- अर्धा टीस्पून, हिरवी मिरची, टोमॅटो, कोथिंबीर तुमच्या आवडीनसार मीठ- चवीनुसार, पाणी-ग्रेव्हीनुसार.

★ **कृती :-** सर्वप्रथम मासे स्वच्छ धुवून स्वच्छ करून घ्यावे. आता त्यात थोडी हळद आणि मीठ टाकून १५ मिनिटे ठेवा (मॅरिनेट होऊ द्या). दरम्यान, पिवळी मोहरी, काळी मोहरी, लसूण, जिरे, काळी मिरी, संपूर्ण धणे आणि हिरवी मिरची मिक्सरमध्ये थोडेसे पाणी घालून बारीक करून गुळगुळीत पेस्ट तयार करून घ्यावी. आता पॅनमध्ये ३ चमचे मोहरीचे तेल घालून चांगले गरम करा, जोपर्यंत तेलातून धूर सुरू होत नाही. आता या गरम तेलात मॅरिनेट केलेले माशाचे तुकडे टाका आणि दोन्ही बाजूंनी हलके सोनेरी होईपर्यंत भाजून घ्यावे. त्यानंतर मासे बाहेर काढून एका प्लेटमध्ये ठेवा. त्याच उरलेल्या तेलात पंचफोरनची फोडणी घालायची. मसाले तडतडायला लागले की, वाटलेला मसाला टाका. बारीक गॅसवर हा मसाला चांगला १० ते १५ परतून घ्या. लक्षात ठेवा, हा मसाला जितका हळू शिजला जाईल तितकी चव चांगली असेल. मसाला तेल सुटू लागल्यावर त्यात हळद, तिखट, चिरलेला टोमॅटो, थोडी कोथिंबीर आणि मीठ घाला. टोमॅटो मऊ होईपर्यंत शिजवा आणि नंतर आवश्यकतेनुसार पाणी घाला आणि ग्रेव्ही तयार होऊ द्या. आता त्यात भाजलेले मासे टाका व उकळी येऊ द्या.




**एम्पाबेचे दोन गोल**

# विश्वचषकात फ्रान्सची इराकवर ३-० विजयासह नॉकआऊटकडे झेप



**विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत फ्रान्सने विजयी मोहिमेला बळकटी देत इराकवर ३-० अशी दणदणीत मात केली. वादळी पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे तब्बल दोन तासांहून अधिक काळ सामना थांबवावा लागला. तरीही फ्रान्सच्या आक्रमक खेळावर त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. संघाचा कर्णधार किलियन एम्बापे याने दोन गोल झळकावत विजयाचा पाया रचला, तर उस्मान डेंबेलेने एक गोल करत फ्रान्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.**

■ फिलाडेल्फिया

**सामन्याच्या** सुरुवातीपासूनच फ्रान्सने चेंडूवरील नियंत्रण राखत इराकच्या बचावफळीवर दबाव निर्माण केला. मायकेल ओलिसे, ज्युल्स कुंदे आणि डेंबेले यांच्या वेगवान हालचालींमुळे इराकच्या बचावपटूंना श्वास घेण्यासही वेळ मिळत नव्हता. अखेर १४व्या मिनिटाला फ्रान्सला यश मिळाले. ओलिसेकडून मिळालेला पास स्वीकारत एमबापेने पेनल्टी क्षेत्राबाहेरून डाव्या पायाने जोरदार फटका मारला. इराकचा गोलरक्षक अहमद बासिल याने केलेला प्रयत्न अपयशी ठरला. याचदरम्यान इराकला मोठा धक्का बसला. संघाचा कर्णधार आणि प्रमुख आक्रमक खेळाडू आयमेन हुसेन दुखापतीमुळे २६व्या मिनिटाला मैदानाबाहेर गेला.

पहिल्या सत्राच्या अखेरीस हवामान अचानक बिघडले. मुसळधार पाऊस आणि विजांच्या धोक्यामुळे पंचांनी सामना थांबवला. प्रेक्षकांना सुरक्षित स्थळी हलवले आणि तब्बल दोन तास ११ मिनिटांनंतर सामना पुन्हा सुरू झाला. दीर्घ खंडामुळे इराकला पुनरागमनाची संधी मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात घडले उलटेच.

दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीलाच इराकच्या बचावपटूंनी केलेल्या मोठ्या चुकीचा फ्रान्सने फायदा घेतला. गोलकिकदरम्यान झालेल्या गोंधळानंतर डेंबेलेने चेंडू ताब्यात घेत एमबापेकडे पास दिला आणि फ्रेंच कर्णधाराने सहज गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. हा एमबापेचा सामन्यातील दुसरा आणि स्पर्धेतील चौथा गोल ठरला. इराकला सावरायची संधी मिळण्यापूर्वीच फ्रान्सने ६०व्या मिनिटाला मायकेल ओलिसेच्या अचूक पासवर उस्मान डेंबेलेने उत्कृष्ट फिनिशिंग करत तिसरा गोल नोंदवला. या गोलनंतर सामना पूर्णपणे फ्रान्सच्या नियंत्रणात गेला. या विजयामुळे फ्रान्सचे दोन सामन्यांत सहा गुण झाले असून संघाचे नॉकआऊट फेरीतील स्थान जवळपास निश्चित झाले आहे.

**२५ जूनचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १२:३० | स्वित्झर्लंड विरुद्ध कॅनडा |
| मध्यरात्री १२:३० | बोस्निया विरुद्ध कतार |
| पहाटे ३:३० | स्कॉटलंड विरुद्ध ब्राझील |
| पहाटे ३:३० | मोरोक्को विरुद्ध हैती |
| सकाळी ६:३० | मेक्सिको विरुद्ध चेक |
| सकाळी ६:३० | दक्षिण आफ्रिका विरुद्ध दक्षिण कोरिया |

दुसरीकडे, इराकला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले असून त्यांचे आव्हान आता कठीण झाले आहे. व्यक्तिगत कामगिरीच्या दृष्टीनेही हा सामना एम्बापेसाठी विशेष ठरला. दोन गोलांच्या जोरावर त्याच्या विश्वचषकातील एकूण गोलांची संख्या १६ वर पोहोचली असून त्याने मिरोस्लाव क्लोजेच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे. तसेच गोल्डन बूटच्या शर्यतीतही तो लिओनेल मेस्सीच्या अगदी जवळ पोहोचला आहे.

## भारतीय क्रिकेट संघातील रोटेशनवर गावस्करांची टीका

■ नवी दिल्ली

**भारतीय** क्रिकेट संघातील सातत्याने होणाऱ्या खेळाडूंच्या रोटेशनवर माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी नाराजी व्यक्त केली. बीसीसीआय वरिष्ठ खेळाडूंना योग्य विश्रांती द्यावी, मात्र त्यासाठी प्रत्येक मालिकेत संघात मोठे बदल करणे टाळण्याचा सल्ला त्यांनी दिला.

आयर्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेच्या पार्श्वभूमीवर गावस्कर यांनी भारतीय क्रिकेटच्या व्यस्त वेळापत्रकावर भाष्य केले. भारत अफगाणिस्तान, झिम्बाब्वे आणि श्रीलंका यांसारख्या संघांविरुद्ध मालिका खेळून त्यांच्या क्रिकेटच्या विकासाला हातभार लावत असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र याच वेळी भारतीय खेळाडूंच्या फिटनेस आणि आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ४४ टक्के वेतनकपात करून पंत पुन्हा दिल्ली कॅपिटल्समध्ये दाखल

■ मुंबई




**आयपीएल** २०२७ पूर्वीच्या सर्वात चर्चित लिलावापैकी एक अखेर अधिकृत झाला असून, भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत पुन्हा एकदा दिल्ली कॅपिटल्सच्या ताफ्यात दाखल झाला आहे. लखनऊ सुपर जायंट्ससोबतचा दोन वर्षांचा प्रवास संपवून पंतने जुन्या संघात पुनरागमन केले असून यासाठी त्याने तब्बल ४४ टक्के वेतनकपात स्वीकारली आहे.

आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरलेला पंत २०२४ च्या लिलावात २७ कोटी रुपयांना लखनऊ सुपर जायंट्समध्ये गेला होता. मात्र दोन हंगामांतील अपेक्षाभंग करणाऱ्या कामगिरीनंतर दोन्ही पक्षांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. आता दिल्ली कॅपिटल्समध्ये परतताना पंतचे मानधन १५ कोटी रुपये निश्चित झाले आहे. या मोठ्या लिलावाचा भाग म्हणून भारताचा फिरकीपटू कुलदीप यादव लखनऊ सुपर जायंट्समध्ये दाखल झाला आहे. दिल्लीकडून गेल्या पाच वर्षांत सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या कुलदीपने ६५ सामन्यांत ७२ बळी घेतले होते.

## वैभव सूर्यवंशीला मिळाली भारताची 'नंबर ३' जर्सी

■ मुंबई




**भारतीय** क्रिकेटमधील सर्वात आश्वासक युवा प्रतिभांपैकी एक असलेल्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघात निवड झालेल्या वैभवला टीम इंडियाची 'नंबर ३' जर्सी मिळाली.

भारतीय संघाचे थ्रोडाउन स्पेशालिस्ट रघू यांनी हॉटेलमध्ये जाऊन वैभवला त्याची पहिली भारतीय संघाची जर्सी दिली.त्याने सांगितले की, हा क्षण आपल्या आयुष्यातील सर्वात मोठ्या क्षणांपैकी एक असल्याचे त्याने सांगितले. ज्या दिवसापासून मी बॅट हातात घेतली आणि क्रिकेट खेळायला सुरुवात केली, त्या दिवसापासून भारतासाठी खेळण्याचे स्वप्न पाहिले होते. आज त्या स्वप्नाच्या पूर्ततेकडे एक मोठे पाऊल टाकले आहे. ही भावना शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे.

आयर्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघ आज रवाना झाला असून त्यामध्ये वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांचा समावेश आहे. जर वैभवला या मालिकेत संधी मिळाली, तर तो भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात युवा खेळाडू ठरू शकतो. सध्या हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिनने १६ वर्षे २०५ दिवसांच्या वयात भारताकडून पदार्पण केले होते. वैभवने गेल्या काही महिन्यांत आपल्या फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधले.

## आयरा जाधवला अंडर-१९, टी-२० आणि वनडे संघात संधी

**मुंबई** - मुंबईच्या युवा आणि आक्रमक फलंदाज आयरा जाधव हिची श्रीलंकेविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी भारतीय अंडर-१९ महिला संघात निवड झाली. विशेष म्हणजे निवड समितीने तिच्या सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरीची दखल घेत टी-२० आणि एकदिवसीय अशा दोन्ही संघांमध्ये तिला स्थान मिळाले आहे. भारतीय अंडर-१९ महिला संघ श्रीलंकेविरुद्ध घरच्या मैदानावर तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. या मालिकेत आयराकडे सलामीवीर म्हणून मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. तिच्या आक्रमक शैलीमुळे भारतीय संघाला मजबूत सुरुवात मिळण्याची आशा आहे.

## श्रीसंत स्लॅपगेट प्रकरणाचा हरभजनला पश्चात्ताप

■ मुंबई

**आयपीएलच्या** इतिहासातील सर्वाधिक गाजलेल्या 'स्लॅपगेट' प्रकरणाबद्दल माजी भारतीय फिरकीपटू हरभजन सिंगने तब्बल १८ वर्षांनंतर मनातील खंत व्यक्त केली आहे. २००८ मध्ये एस. श्रीसंतला थप्पड मारण्याची घटना ही आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठ्या चुकांपैकी एक असल्याचे मान्य करत, अवघ्या पाच सेकंदांच्या रागाने माझी प्रतिमा खराब केली, अशी कबुली हरभजनने दिली. श्रीसंतने नुकतेच भज्जीला बॉक्सिंग रिंगमध्ये उतरण्याचे आव्हान दिल्यानंतर पुन्हा चर्चेत आलेल्या या वादावर बोलताना हरभजनने त्या घटनेबद्दल आजही पश्चात्ताप होत असल्याचे सांगितले.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**उप मुख्य अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या) पूर्व उपनगर**
**यांचे कार्यालय**
५ वा मजला, परिवार बिल्डींग, प्लॉट क्र. सीटीएस क्र. ११९/बी, गाव कांजूर (पूर्व), मुंबई ४०००४२.
**क्र. डीवाय.सीएच.ई./६०५१/एसडब्ल्यूडी/ईएस दि. २२ जून, २०२६**

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त पूर्व उपनगरामधील खालील कामांकरिता पाकीट 'अ', 'ब' आणि 'क' प्रणालीमध्ये शतमान तत्त्वावर ई-निविदा मागवित आहेत. बोली सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ आणि बोली समाप्तीचा दिनांक आणि वेळ बृ.मुं.म.पा. च्या वेबसाईटवर निविदा अनुभागाअंतर्गत तपशिलवार निविदा सूचनेमध्ये निर्दिष्ट करण्यात आले आहे.

| कामाचे नाव | अंदाजित रक्कम | ईएमडी रक्कम | वर्ग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| निविदा आयडी क्र. **२०२६_बृमुंमपा_१३१००२२** **ईएस-५३०** केंद्रीय एजन्सीद्वारे झो-V, पूउ मध्ये वर्ष २०२५-२६ करिता 'एल' प्रभागामध्ये विविध ठिकाणी नाला, बॉक्स ड्रेन्स, पडलेल्या भिंती आणि पर्जन्य जल विहिन्यांची सुधारणा/ पुनर्बांधकाम/बांधकाम | रु. १०,८२,९७,९८५.०० | रु. १०,८३,०००.०० | नवीन नोंदणी नियमनांनुसार वर्ग I (सी) | ९ महिने (पावसाळा वगळता) |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अधिक तपशिलाकरिता महाटेंडरची वेबसाईट **http://mahatenders.gov.in** येथे भेट द्यावी.

सही/-
पीआरओ/६४५/जाही./२०२६-२७ उप मुख्य अभियंता (प.ज.वा) पू.उ.

स्वमर्जीने औषधोपचार करू नका

# भोसरी प्रकरणी खडसे कुटुंबीय तपासात सहकार्य करत नाही

■ मुंबई

**भोसरी** जमीन गैरव्यवहार प्रकरणी पुणे पोलिसांनी दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याच्या तपासात माजी कॅबिनेट मंत्री आणि विद्यमान आमदार एकनाथ खडसे यांचे कुटुंबीय सहकार्य करत नसल्याची तक्रार सरकारी वकील शिशिर हिरे यांनी आज हायकोर्टाकडे केली. याबद्दल न्यायमूर्ती आश्विन भोबे यांनी खडसेंच्या वकिलांकडे विचारणा केली. असे असेल तर या प्रकरणातील स्थगिती हटवून याचिका गुणवत्तेच्या आधारावर सुनावणीस घेऊ, असा इशारा दिला. तूर्तास हायकोर्टाने मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपीएमएलए न्यायालयात सुरू असलेल्या आरोप निश्चितीच्या प्रक्रियेला दिलेली अंतरिम स्थगिती पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवली आहे.

एकनाथ खडसे यांनी स्वतःसह पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीष चौधरी यांच्यावर आरोप निश्चित करण्यासाठी विशेष न्यायालयात सुरू असलेल्या कार्यवाहीला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी हायकोर्टाकडे केली. ३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाने भोसरी येथील जमीन विक्रीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात नोंदवलेल्या गुन्ह्यात एकनाथ खडसे आणि त्यांच्या कुटुंबियांना दोषमुक्त करण्यास नकार दिला होता. त्यानंतर विशेष न्यायालयाने १६ जानेवारीच्या सुनावणीत सर्व आरोपींवर आरोप निश्चित करणार असल्याचे स्पष्ट केले होते. या निर्णयाला एकनाथ खडसे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.



# विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या रासायनिक वज्रलेपनास न्यायालयाची स्थगिती

■ पंढरपूर

**श्री विठ्ठल**-रुक्मिणी मूर्तीवर मंदिर समिती आणि पुरातत्त्व विभागाकडून २३ व २४ जून रोजी प्रस्तावित करण्यात आलेल्या रासायनिक वज्रलेपन प्रक्रियेला पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयाने (कनिष्ठ स्तर) अंतरिम स्थगिती दिली आहे. पुढील आदेश येईपर्यंत मूर्तीवर कोणत्याही प्रकारचे रासायनिक लेपन करू नये, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

वारकरी संप्रदायाचे बाळकृष्ण डिंगरे आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुरुषोत्तम लंके यांनी यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता सुधीर रानडे यांनी बाजू मांडली. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने मंदिर समितीला वज्रलेपन प्रक्रिया न राबविण्याचे आदेश दिले. सुनावणीदरम्यान महाकालेश्वर मंदिर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा संदर्भ देण्यात आला.

# संत तुकोबांच्या पालखीचे ७ जुलैला प्रस्थान होणार

देहू - आषाढी एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असल्याने पंढरीच्या वारीची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर श्री संत तुकाराम महाराज संस्थानने संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार, श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी ७ जुलै रोजी भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. १८ दिवसांचा पायी प्रवास पूर्ण करून पालखी २४ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होईल. यंदा संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे ३४१ वे वर्ष असून, लाखो वारकरी या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

# बीकेसी मेट्रोच्या इमारतीमध्ये विषारी साप आढळल्याने खळबळ

■ मुंबई

**आरे** ते कफ परेड या भुयारी मेट्रो-३ मार्गिकेवरील वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) मेट्रो स्थानकाच्या प्रवेशद्वार क्रमांक ५-अ जवळील इमारतीच्या तळघरात आज सकाळी अतिविषारी घोणस साप आढळल्याने खळबळ उडाली. सुमारे दोन ते अडीच फूट लांबीच्या या सापाला सर्पमित्रांनी सुरक्षितपणे पकडले. मिठी नदीलगतचा परिसर आणि बीकेसी भाग हा सापांच्या अधिवासासाठी ओळखला जातो. त्यामुळे या परिसरात साप आढळण्याच्या घटना अधूनमधून घडत असतात.

## जाहीर सूचना

कॅनरा बँक विरुद्ध मे. ज्वेल टेक (आय) लिमिटेड चे वैयक्तिक जामीनदार श्री. शैलेश जे. मेहता यांच्या प्रकरणामध्ये नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ९५(१) अन्वये दाखल सी.पी. (आयबी)/२७७(एमबी)२०२६ मध्ये माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे पारित आदेश दिनांक २४.०४.२०२६च्या अनुषंगाने, श्री. शैलेश जे मेहता यांना या निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी या वृत्तपत्रात ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत, अंतरिम ठराव व्यावसायिकांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ९९(२) नुसार, मे. ज्वेल टेक (आय) लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदाराच्या निवासी पत्ता, ३ के, अलंकार, ३ हार्कनेस रोड, मुंबई - ४००००६ येथे दिनांक १०.०६.२०२६ रोजी आधीच पाठवलेल्या पत्राला उत्तर द्यावे.

अधिक तपशिलाकरिता, संपर्कः
संजय कथाने, आयआरपी
आयबीबीआय नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-002/ IP-N01139/2021-2022/13818.
संपर्क तपशील +९१ ९००४६५२४८१,
ईमेल आयडीः sanjaykathane@yahoo.com

---

मुख्य कार्यालय :
विरार (पश्चिम),
ता. वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७

जावक क्र. : व.वि.श.म./बांध/शअ/०७/२०२६-२७
दिनांक : २३/०६/२०२६

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**सार्व. बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार (पूर्व)**
**जाहिर सविस्तर ई-निविदा सूचना**

१. वॉर्ड क्र. २७ मध्ये नायगाव परेरा नगर जे. बी. सहारा बिल्डिंग जवळ गटार बांधणे.
२. वॉर्ड क्र. २७ मध्ये नायगाव गणेश नगर येथे आर.सी.सी. गटार बांधणे.
३. वॉर्ड क्र. २० मध्ये डम्पिंग ग्राऊंड येथे सागर प्लाझा इंडस्ट्री जवळ आर.सी.सी. गटार बांधणे.
४. वॉर्ड क्र. २० मध्ये वालीव गाव येथे प्रकाश सुतार यांचे घर ते नितीन पायगावकार यांच्या घरापर्यंत आर. सी. सी. गटार व सी.सी. पाथवे बांधणे.
५. वॉर्ड क्र. २० मध्ये सांतिवली अनुबाई भिमरावाडी ते सातिवली नाका मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे.
६. वॉर्ड क्र. २७ मध्ये जुचंद्र फाटक येथिल हितेंद्र म्हात्रे यांचे घर ते प्यारेलाल चाळ पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे व सी.सी. पाथवे बांधणे.

कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेत स्थळावर दि. २४/०६/२०२६ पासून उपलब्ध होणार आहे. ई टेंडरींग बाबत अधिक माहितीसाठी ई- निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

जा. क्र. : वविराम /बांध/शअ/०७/२०२६-२७
दिनांकः २३/०६/२०२६
Please Visit our official web-site
( https://mahatenders.gov.in )
जा.क्र.ः व.वि.श.म./मा.व.ज./३६३/२०२६

सही/-
**(प्रदीप पाचंगे)**
प्र. शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका

---

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

**जा.क्र. अंनप/मिळकत/२०२६-२७/४६/जनसंपर्क-१६.** **दिनांकः** २३/०६/२०२६

**: नोटीस :**

अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिक, वाणिज्य संस्था, जाहिरात संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, बिल्डर असोसिएशन, इ. ना आवाहन करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयीन प्रकरण PIL १५५ / २०११ नुसार अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग्ज बाबत जनहित याचिका दाखल आहे. तसेच दिनांक. १३/०५/२०२४ रोजी घाटकोपर, मुंबई येथे जाहिरात फलक कोसळल्याची दुर्घटनांझाल्यामुळे जीवीतहानी झाली आहे. अशा अप्रिय घटना टाळण्याच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या संस्था, राजकीय पक्ष, विकासक, इ. यांनी अंबरनाथ शहर हद्दीत अनधिकृत होर्डिंग्ज, कि-ऑक्स, फ्रेम्स्, उभारले आहेत अशा सर्वांना याद्वारे आवाहन करणेत येते की सदर अनधिकृत होर्डिंग्ज ४८ तासांच्या आत स्वतःहुन काढुन घ्यावे. तसेच भविष्यात सदर होर्डिंग्ज फ्रेम्स, यामुळे काही अपघात उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी होर्डिंग्ज / फ्रेम्स / कि ऑक्स / उभारणाऱ्या संस्थेवर निश्चित करणेत येईल याची नोंद घ्यावी.

याद्वारे शहरातील नागरीकांना, वाणिज्य संस्था, जाहिरात संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, बिल्डर असोसिएशन यांना सुचित करणेत येते की त्यांनी ह्यापुढे नगरपरिषद हद्दीत कोणत्याही प्रकारचे अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग्ज, पोस्टर्स, झेंडे, इ. उभारण्यात येवू नये. अनधिकृत जाहिरात फलक उभारल्याचे निदर्शनास आल्यास व्यक्ति अथवा आपल्या संस्थेवर महाराष्ट्र मालमत्ता विरूपण प्रतिबंधात्मक कायदा १९९५ नुसार कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सदर कालावधीचे जाहिरात कर आपल्या मिळकतीवर बोजा चढवुन सदर जाहिरात कराची वसुलीही करणेत येईल.

आदेशानुसार.

सही/-
**(उमाकांत गायकवाड)**
**मुख्याधिकारी,**
**अंबरनाथ नगरपरिषद.**

जा.क्र. अंनप/मिळकत/२०२६-२७/४५/जनसंपर्क-१६.

---

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

E-Tenders are invited from experienced Licensed Electrical contractors for the work as detailed below.

| | | | |
|---|---|---|---|
| Tender No. | **SE/KC-II/Tech/CMRI/UL-I/2026-27/T-01** | Sale of Tender Date 22.06.2026 | Date of Pre bid meeting at 11.00 hrs. on 24.06.2026 |
| Estimated Amount | **Rs. 27.50 Lakhs** | Last Date of Submission of e-tender 29.06.2026 up to 15.00 hrs. | |
| Tender form fee | Rs. 5900/- (Including 18% GST) | | |
| Name of work | Annual contract for monthly meter reading of LT Consumers having load above 20 KW & some LT consumers having load below 20KW with AMR/MRI compatible meters (having TOD tariff) excluding smart meters installed through CMRI under Ulhasnagar - II Division | | |
| EMD Amount | Rs. 27,500/- (Rs. Twenty Seven Thousand Five Hundred only) | | |

The bidders are requested to get registered for e-tendering procedure.
Contact Person – Executive Engineer (Admin.)
MSEDCL, Kalyan –II circle (O&M), Tejashree, Third floor, Kalyan (W) - 421 301
Email – sekalyan2@gmail.com
Mobile No. 8873626969 Website-www.MSEDCL e-tendering

Sd/-
**Executive Engineer (Admin), Kalyan Circle II**

---

## मुंबई पत्तन प्राधिकरण
**स्थापत्य अभियांत्रिकी विभाग**

**सार्वजनिक सूचना – रस्ता बंद**

सुरक्षेच्या कारणास्तव सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, वडाळा येथील गणेश मंदिराजवळ वडाळा–माहुल मार्गावरील खारू क्रीक पूल वाहतुकीसाठी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात येत आहे.

सर्वसामान्य जनतेने खालील पर्यायी मार्गांचा वापर करावा:
१) एमबीपीए हॉस्पिटल रोड-दयाशंकर चौक, वडाळा.
२) ओजीपीडी - पी डी मेलो रोड - वडाळा
३) एमबीपीए रस्ता - शिवरी - अटल सेतू.
झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

**मुख्य अभियंता**
**मुंबई पत्तन प्राधिकरण**

---

## ठाणे महानगरपालिका, ठाणे
अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग
जाहिर आवाहन

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांना जाहिर आवाहनाद्वारे सुचित करण्यात येते की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता "पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४" (२०१४ चा ७) तसेच "पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७" मधील मुद्दा क्र.२.१ मध्ये प्रथम सर्वेक्षणानंतर दर पाच वर्षांनी पुन:सर्वेक्षण करण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान सर्व फेरीवाल्यांचे प्रत्यक्ष व्यवसाय करीत असलेल्या ठिकाणी भेटी देऊन पुन:सर्वेक्षण करण्याचे ठाणे महानगरपालिकेने निश्चित केले आहे. सदरचे सर्वेक्षण गुरुवार दि.२५/०६/२०२६ पासून एकाचवेळी सर्व नऊ प्रभाग समिती कार्यक्षेत्रात सुरु करण्यात येणार आहे. तरी सर्वेक्षणासाठी फेरीवाल्यांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी व्यक्तीशः उपस्थित राहणे आवश्यक आहे. एकदा एका रस्त्यावरील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाल्यानंतर पुन्हा त्या रस्त्यावरील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार नाही, याची सर्व फेरीवाल्यांनी नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/अ.नि. नि वि/२३४/२०२६-२७
दि.२३/०६/२०२६
Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

**सही/-**
उपायुक्त
अतिक्रमण व निष्कासन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

---

## जेओडीपीएल प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
नोंदणीकृत कार्यालय - प्लॉट क्र. १५ नॉलेज पार्क II, गौतम बुद्ध नगर, ग्रेटर नोएडा, उत्तर प्रदेश, भारत, २०१३०६.
सीआयएनः U11101UP2004FTC047908
(माननीय एनसीएलटीच्या आदेश दिनांक १८ डिसेंबर, २०१७ नुसार परिसमापनाअंतर्गत कंपनी)

**ई-लिलावाकरिता जाहीर उद्घोषणा**
**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि विनियमनाअंतर्गत सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांद्वारे तमाम जनतेस याद्वारे ई-लिलावाची सूचना देण्यात येते की, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ (**"आयबीसी"**) च्या तरतुदी सहवाचिता त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि विनियमनांनुसार कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **जेओडीपीएल प्रायव्हेट (परिसमापनामध्ये) ("कॉर्पोरेट ऋणको")** च्या मालकीच्या २ मालमत्तांच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या) *'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसेच आहे', 'तेथे जे आहे', 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'*, कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय विक्रीकरिता बोली आमंत्रित करण्यात येत आहेत.

विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे इतर बाबींसोबतच आयबीबीआय (विनियमन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि बँकनेट येथे या लिंकवर उपलब्ध असलेल्या मालमत्ता विक्री प्रक्रिया ज्ञापनपत्र दिनांक २३ जून, २०२६ (**"एएसपीएम"**) नुसार ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचा ईबीक्रय) https://ibbi.baanknet.com (**"ई-लिलाव प्लॅटफॉर्म"**) द्वारे करण्यात येईल

| ई-लिलावाच्या महत्त्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक | |
|---|---|
| पात्रता दस्तऐवज आणि कलम २९ए हमी सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | दि. २४ जुलै, २०२६, १७.०० वाजेपर्यंत |
| इसारा रक्कम अनामत (**"ईएमडी"**) जमा करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | दि. २४ जुलै, २०२६, १९.०० वाजेपर्यंत |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | दि. २७ जुलै, २०२६, १०.०० ते १८.०० |
| अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याचा अंतिम दिनांक | निम्नस्वाक्षरीकारांद्वारे अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याकरिता मागणी पत्र पारित केल्यापासून साठ (६०) दिवसांमध्ये |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन (मालमत्ता आयडी बँकनेटवर) | लिलाव आयडी | राखीव किंमत* (रु.मध्ये) | इसारा रक्कम अनामत (रु.मध्ये) | विस्तारयोग्य मूल्य (रु.मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाव पाली, तालुका सुधागड, जिल्हा रायगड, महाराष्ट्रचा सर्व्हे क्र. ३६ए/प्लॉट७ धारण केलेला अ-कृषिक, निवासी जमिनीचा भूखंड मोजमाप २०० चौ.मी. | ४००९ | १२,२६,४५० | १,२२,६४५ | ५०,००० |
| २ | गाव अष्टमी, तालुका रोहा, जिल्हा रोहा, महाराष्ट्रचा सर्व्हे क्र. ३४बी + ३५बी/प्लॉट ३८ धारण केलेला अ-कृषिक, निवासी जमिनीचा भूखंड मोजमाप २३७ चौ.मी. | ४०१० | १२,११,३०७ | १,२१,१३१ | ५०,००० |

*इतर गोष्टींबरोबरच कर, आकारणी, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेले सर्व आवश्यक खर्च वगळता. निम्न स्वाक्षरीकारांकडून कोणतेही प्रतिनिधित्वे, हमी आणि नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या टिपाः**
१. वरील सूचिबद्ध २ मालमत्तांकरिता ई-लिलाव स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.
२. ही विक्री सूचना बँकनेट येथे या **लिंक** वर उपलब्ध असलेल्या, मालमत्तेची माहिती, घोषणापत्र, प्रतिज्ञापत्र आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्र आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट असलेल्या संबंधित एएसपीएमसह वाचावी.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता दस्तऐवज आणि ईएमडी ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित वेळमर्यादेमध्ये सादर करावेत.
४. संभाव्य बोलीदारांनी त्यांना आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणतीही अपात्रता नाही असे हमीपत्र सादर करावी आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, त्यांनी सादर केलेली ईएमडी जप्त करण्यात येईल.
५. ई-लिलावासंबंधी कोणत्याही प्रश्नासाठी कृपया परिसमापकांचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. समर्थ कटारिया (मोबाईल +९१ ८८२६५२२३२५) यांना "जेओडीपीएल प्रायव्हेट लिमिटेडः मालमत्ता विक्री - जमीन खंड" या विषयासह ip.jodpl@in.ey.com वर संपर्क साधावा.
६. हे स्पष्ट करण्यात येते की, ही सूचना विक्री करण्यासाठी निम्नस्वाक्षरीकारांकडून किंवा जेओडीपीएल प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापक) कडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. निम्नस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. परिसमापकास त्याच्या विवेकबुद्धीनुसार एएसपीएमच्या अटींमध्ये सुधारणा/बदल करण्याचा आणि ई-लिलावाच्या तारखा समाविष्ट असलेल्या आणि त्यास मर्यादित न राहता, विक्री प्रक्रियेच्या वेळेत सुधारणा करण्याचा अधिकार आहे. एससीसीच्या सल्ल्यानुसार, परिसमापकास लागू कायद्याअंतर्गत अन्यथा प्रदान केल्यानुसार आणि त्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया मागे घेण्याचा/रद्द करण्याचा अधिकार आहे.

**दिनांकः २३.०६.२०२६**
**ठिकाणः नवी दिल्ली**

**सही/-**
**दिनकर वेंकटसुब्रमनियन**
**जेओडीपीएल प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक**
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00003/2016-17/10011
एएफए क्र. AA1/10011/02/300627/109248
एएफए वैधता दि. ३० जून, २०२७ पर्यंत
ईमेलः ip.jodpl@in.ey.com

---

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा जि.ठाणे.**
सहकार विद्याप्रसारक मंडळशाळेसमोर, जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, पीन - ४००६०५
Email- eemsddkalwa@yahoo.co.in Phone & Fax No. 022-25374770

**ई-निविदा सुचना क्र. ०३ (व्दितीय वेळ) सन-२०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई - निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन बांधकाम विभाग, जळगांव यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.३७,६९,२००/- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| २. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, ठाणे पाटबंधारे विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.३७,०८,०००/- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| ३. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) यांच्या कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा कालवे विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.६२,३१,६००/- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| ४. | **कामाचे नांव** | **मा. जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळ) यांच्या कार्यालयाकरिता कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा यांच्या नियंत्रणाखाली (कार्यकारी अभियंता, पुणे सिंचन विभाग यांच्या खर्ची पडणारा निधी ) १२ महिन्यासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने उपलब्ध करुन देणेबाबतचे काम.** |
| | जिल्हा | मुंबई |
| | निविदेची किंमत रुपये | रु.५४,६१,२०० /- (सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक:- २४/०६/२०२६ ते दिनांक ०१/०७/२०२६
निविदा उघडणे : दिनांक-:०५/०७/२०२६

जा.क्र.यांभांविवि/लेशा-२/११५९/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे.
दिनांक :-१७/०६/२०२६

सही/-
**(सं.ना. रोकडे)**
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी१२६२

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
**अ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग**
**ई निविदा सूचना क्र.०१/०२/२०२६-२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.
१. निविदेचा दर भरताना एकुण निविदा रक्कमेतून मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रक्कमेवर निविदा दर भरावेत.
२.प्रचलीत दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३.रॉयल्टीबाबत मनपा जे धोरण ठरवेल ते आपणावर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मध्ये मंडप विषयक कामे करणे. ( सन २०२६-२७) | ७८७१३२ | ७८७१३२ | ० | ० | ७८७१ | ३९३५७ | १२ | १६६० |
| २ | प्रभाग क्र.१५ मधील अतिक्रमण कारवाईकरिता मनुष्यबळ व यंत्रणा पुरविणे.(सन २०२६-२७) | ७८७४४२ | ७८७४४२ | ० | ० | ७८७४ | ३९३७२ | १२ | १६६० |

**निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक २४/०६/२०२६ ते ३०/०६/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक ३०/०६/२०२६ दुपारी ०३.०० पर्यंत |
| निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ | निरंक |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक ०१/०७/२०२६ |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर नामंजूर क्रण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी स्वतः कडे ठेवला आहे.निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई - निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू राहिल सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. १.https://www.mahatenders gov.in सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
(प्रकाश जाधव)
लेखाधिकारी
अ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी - ४४

सही/-
(वैशाली ननावरे)
कार्यकारी अभियंता(स्थापत्य)
अ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी - ४४

सही/-
(निवेदिता घार्गे)
सहा. आयुक्त
अ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी - ४४

जाहिरात क्र. २०२६-२७/६९
का क्र. अक्षेका/लेखा/०६/कावि/१४२/२०२६
दिनांक : २३/०६/२०२६
निविदापुर्वक सभा दि.

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# समंथाच्या घरी येणार नवा पाहुणा



**प्रसिद्ध** अभिनेत्री समंथा रुथ प्रभू आणि तिचे पती, प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माते राज निदिमोरू यांच्या घरी लवकरच एका चिमुकल्या पाहुण्याचे आगमन होणार आहे. समंथा आणि राज पहिल्यांदाच आई-बाबा होणार असून, या आनंदाच्या बातमीला अधिकृत दुजोरा मिळाला आहे. समंथाचा नुकताच प्रदर्शित झालेला 'मां इंटी बंगारम'हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत असतानाच, तिच्या वैयक्तिक आयुष्यातूनही ही आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर समंथाच्या गरोदरपणाबाबत जोरदार चर्चा सुरू होती. 'मां इंटी बंगारम' चित्रपटाच्या यशाचे सेलिब्रेशन करण्यासाठी समंथा तिच्या टीमसोबत आणि पती राज निदिमोरू यांच्यासोबत एकत्र आली होती. या कार्यक्रमाचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर चाहत्यांनी समंथाचा बेबी बंप नोटीस केला आणि तिच्या प्रेग्नन्सीच्या चर्चांना उधाण आले.आता या सर्व चर्चांवर 'दिग्दर्शिका बी. व्ही. नंदिनी रेड्डी यांनी शिक्कामोर्तब केले आहे. या वर्षाच्या शेवटी म्हणजेच डिसेंबर २०२६ मध्ये समंथाच्या बाळाचा जन्म होणार आहे.

# चित्रपट नाकारण्यास कारण की...



'आशिकी' या चित्रपटातून एका रात्रीत स्टार बनलेली अभिनेत्री अनु अग्रवाल हिने तिच्या अभिनय कारकिर्दीत अनेक चित्रपटांचे प्रस्ताव का नाकारले, यामागील मुख्य कारणाचा खुलासा केला आहे. सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे तिने तिच्या चित्रपट निवडीच्या प्रक्रियेवर आणि प्रेक्षकांप्रती असलेल्या तिच्या जबाबदारीच्या भावनेवर प्रकाश टाकला आहे. अनु अग्रवाल हिने सांगितले की, एक अभिनेत्री म्हणून काम करताना तिला नेहमी एक गोष्ट मनापासून जाणवायची, ती म्हणजे प्रेक्षक तिचे चित्रपट पाहण्यासाठी स्वतःचे पैसे खर्च करतात. चित्रपट पाहणारे बहुतांश लोक हे मध्यमवर्गीय किंवा निम्न-मध्यमवर्गीय कुटुंबातील असतात, जे अत्यंत कष्टाने पैसे साठवून चित्रपटाचे तिकीट खरेदी करतात. त्यामुळे, आपण त्यांना जे मनोरंजन किंवा मूल्य देत आहोत, ते त्यांनी मोजलेल्या पैशांपेक्षा अधिक मोलाचे आहे का, असा प्रश्न ती स्वतःला विचारायची. या विचारसरणी मुळेच तिच्या चित्रपट निवडण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला. अनुच्या मते, एखादा चित्रपट केवळ व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होणे पुरेसे नसते, तर तो चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या वेळेला आणि विश्वासाला पात्र असणे आवश्यक आहे. केवळ एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये (टाईपकास्ट) अडकणे टाळणे एवढाच तिचा हेतू नव्हता, तर थिएटरमध्ये बसलेल्या प्रेक्षकांचा आदर करणे ही ती स्वतःची जबाबदारी मानायची. प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले असल्याने त्यांच्या वेळेचा आणि विश्वासाचा सन्मान राखणे हे आपले कर्तव्य असल्याचे तिने नमूद केले.

# जेपी फिल्म्सचा धमाका



'बॉर्डर २' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर, जेपी फिल्म्स या निर्मिती संस्थेने आपल्या आगामी पाच मोठ्या प्रकल्पांची अधिकृत घोषणा केली आहे. या प्रसिद्ध बॅनरचे संस्थापक आणि ज्येष्ठ दिग्दर्शक जेपी दत्ता यांच्या कन्या, निर्मात्या निधी दत्ता यांनी एका मुलाखतीदरम्यान या महत्त्वाकांक्षी योजनांचा खुलासा केला. यामध्ये प्रामुख्याने लष्करी पार्श्वभूमी असलेले चित्रपट, ऐतिहासिक चरित्रपट आणि एका मोठ्या फ्रँचायझीचा समावेश आहे.

या संपूर्ण यादीतील सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे 'बॉर्डर ३'. टी-सीरिजचे भूषण कुमार यांच्यासोबत भागीदारीत या चित्रपटाची निर्मिती केली जाणार असून, सध्या तो प्राथमिक टप्प्यात आहे. भव्य कॅनव्हासवर भारतीय सैनिकांचे शौर्य आणि राष्ट्रभक्तीची कथा पडद्यावर आणण्याचा निर्मिती संस्थेचा मानस आहे. याखेरीज१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान भारतीय लष्कराचे नेतृत्व करणारे वीर योद्धा जनरल हरबक्ष सिंग यांच्या जीवनावर आधारित एका भव्य चरित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. १९६६ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. भारतीय लष्करी इतिहासातील हे सुवर्णपान नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न असेल.

# इमरान हाश्मीचा 'रूह'



**अभिनेता** इमरान हाश्मी तब्बल पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा हॉरर म्हणजेच भयपटाच्या विश्वात पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी 'रूह' या चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, हा चित्रपट २०२७ मध्ये चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. हा एक हाय-कॉन्सेप्ट म्युझिकल-हॉरर चित्रपट असेल, जो हिंदीसह तमिळ आणि तेलुगू अशा तीन भाषांमध्ये प्रदर्शित केला जाईल.

या चित्रपटाचे दिग्दर्शन मयांक शर्मा करत आहेत. त्यांनी यापूर्वी 'ॲमेझॉन प्राईम व्हिडिओ'वरील गाजलेल्या 'ब्रीद' या वेब सिरीजचे दिग्दर्शन केले आहे. मानवी भावनांचा कल्लोळ आणि मानसिक खेळ पडद्यावर मांडण्यात त्यांचा हातखंडा मानला जातो. हा चित्रपट केवळ भीती दाखवणारा नसेल, तर त्यात भावना, गूढ वातावरण आणि संगीताचा उत्तम मिलाफ पाहायला मिळेल, असा विश्वास दिग्दर्शकांनी व्यक्त केला आहे.

# वृक्षतोडीमुळे सयामी संतापली



**अभिनेत्री** सयामी खेर हिने नाशिकमधील तिच्या घराशेजारील २०० वर्षे जुने झाड तोडल्याबद्दल तीव्र संताप आणि दुःख व्यक्त केले आहे. विकासाच्या नावाखाली दोन शतके जुना नैसर्गिक वारसा नष्ट केल्याने तिने समाज आणि प्रशासनाच्या मानसिकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

सयामीने सांगितले की, नाशिकमधील तिच्या घरापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर हे प्रचंड मोठे झाड होते. या रस्त्यावर अशी एकूण तीन जुनी आणि मोठी झाडे होती, जी उन्हाळ्यात आणि भर पावसात अनेक वाटसरूंना हक्काची सावली आणि आसरा द्यायची. मात्र, आता विकासाच्या नावाखाली हे झाड कापून टाकण्यात आले आहे. यावर तीव्र आक्षेप घेत सयामी म्हणाली, या झाडाने तब्बल २०० उन्हाळे सोसले आणि ते जिवंत राहिले, पण ते आपल्या माणसांपासून वाचू शकले नाही. प्रशासनाच्या आणि लोकांच्या बदलत्या मानसिकतेवर बोट ठेवत ती पुढे म्हणाली, आम्ही लहान असताना शिक्षक आम्हाला झाडांचे महत्त्व सांगणारे निबंध लिहायला लावायचे. आपण पर्यावरण दिन साजरा करतो. पण असे दिसते की हा सगळा अभ्यास केवळ लहान मुलांसाठीच आहे, प्रौढांच्या अभ्यासक्रमात याचा समावेश नाही. तिने उपरोधिक टोला लगावत म्हटले की, २०० वर्षे जुनी झाडे तोडणे ही चांगली कल्पना आहे असे ज्या प्रौढांना वाटते, त्यांची कार्यालये एसी नसलेल्या आणि थेट ५० अंश सेल्सिअस तापमान असणाऱ्या त्याच उघड्या जागेवर थाटली पाहिजेत.

# शहापूरच्या काळू शाई धरणाच्या विरोधात शेतकऱ्यांची एकत्रित बैठक

■ शहापूर

**तालुक्यातील** काळू शाई धरणाच्या माध्यमातून मुंबईसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरसारख्या वाढत्या शहरांना पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने एमएमआरडीए माध्यमातून धरणाचे नियोजन आखले जात असताना धरणाला विरोध दर्शविण्यासाठी संघर्ष समिती आक्रमक झाली आहे. या धरणाच्या रणनीती तयार करण्यासाठी नुकतीच शेतकऱ्यांची एकत्रित बैठक पार पडली. काळू नदी धरणग्रस्त सामाजिक संस्था, काळू परिसर यांच्या वतीने आंबिवली येथे काळू धरण विरोधी संघर्षाचे धोरण ठरविण्यासाठी परिसरातील शेतकरी व आदिवासी बांधव यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा, धरण संबंधी प्रशासकीय पातळीवर सुरू असलेल्या हालचाली व निर्माण झालेले शेतकरी प्रश्न यावरचर्चा करण्यात आली. सरकारच्या या अन्यायकारक धोरणाविरोधात सर्वच काळू व शाई धरण परिसरातील नागरिकांनी एकत्र येत रस्त्यावर उतरण्याची तयारी करण्याचे आवाहन जेष्ठ शेतकरी कार्यकर्ते हरिभाऊ राऊत यांनी केले.

# नंदुरबार शासकीय वसतिगृहात २२ विद्यार्थिनींना विष देण्याचा कट?

ऑडिओ व्हायरल

■ नंदुरबार

**नंदुरबार** शहरातील समाज कल्याण विभागाच्या मुलींच्या शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या २२ विद्यार्थिनींच्या अन्नात आणि पिण्याच्या पाण्यात विष मिसळण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या आरोपांमुळे विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनातही खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात दोन महिला कर्मचाऱ्यांमधील कथित संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये विद्यार्थिनींच्या अन्नात आणि पाण्यात विष टाकण्याबाबत चर्चा झाल्याचा दावा करण्यात येत आहे. ऑडिओ आल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तसेच वसतिगृहातील विद्यार्थिनींनी या घटनेविरोधात आंदोलन सुरू केले आहे. दोषी महिला कर्मचाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, त्यांना निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून वसतिगृह प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# नितेश राणेंच्या वाढदिवसानिमित्त मातोश्रीबाहेर हिंदू गब्बर बॅनर

■ मुंबई

**मंत्री** नितेश राणे यांच्या वाढदिवसानिमित्त आज मुंबईतील कलानगर परिसरात, विशेषतः मातोश्रीबाहेर आणि आसपासच्या भागात शुभेच्छांचे बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरवर नितेश राणे यांचा उल्लेख हिंदू गब्बर आणि वस्ताद असा करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राणे समर्थकांच्या वतीने लावण्यात आलेल्या या बॅनरवर भाजपाच्या अनेक नेत्यांची छायाचित्रेही झळकत आहेत. खासदार फुटीनंतरच्या राजकीय घडामोडी आणि वाढदिवसाचे निमित्त साधत उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करणारा संदेश या बॅनरमधून देण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मयूर बागोरिया या कार्यकर्त्याच्यावतीने हे बॅनर लावण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, गेल्या वर्षीदेखील याच ठिकाणी नितेश राणे यांच्या समर्थनार्थ अशाच स्वरूपाचे बॅनर लावण्यात आले होते. त्यावेळी त्यांचा उल्लेख हिंदूरक्षक असा करण्यात आला होता. यंदा मात्र हिंदू गब्बर आणि वस्ताद या उल्लेखांमुळे या बॅनरने अधिक लक्ष वेधून घेतले आहे.

# यावर्षी गणेशमूर्ती महागणार किमतीत २५ टक्के वाढ होणार

कच्चा माल,वाहतूक खर्चात मोठी वाढ !

■ नवी मुंबई

**पश्चिम** आशियातील युद्धजन्य परिस्थितीचा फटका यंदा गणेश मूर्तीनाही बसला आहे. इंधनासह शाडूची माती, प्लॅस्टर ऑफ पॅरिस, रंग आदी कच्चा माल आणि वाहतूक खर्चात वाढ झाल्यामुळे यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.महागाईचा हा बोजा थेट गणेशोत्सव साजरा करणाऱ्या भाविकांवर पडणार आहे.

युद्ध स्थितीमुळे डिझेल, गॅस आदी कच्चा माल महागला. पर्यायाने गणेशमर्ती व्यवसायावरही त्याचा परिणाम होत आहे. मूर्ती कलेसाठी परदेशातून रंगांचे साहित्य, प्लास्टिक मूर्ती बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल जवळपास ३० टक्क्यांनी महागला आहे. त्यामुळे पनवेल आणि पेणमधील शेकडो मूर्तिकारांनी २५ टक्के दरवाढीचा निर्णय आतापासून जाहीर केला आहे. यापूर्वी मिळणारे पेंटिंगचे साहित्य, प्लास्टिक कव्हर, ताडपत्री, पिशवी पॅकिंग टेप अशा सगळ्याच वस्तू महागल्या आहेत. गणेशमर्ती वाहून नेणाऱ्या वाहनांना लागणारे इंधनही महागले आहे.पेणच्या कारखान्यांतून लाखो गणेशमूर्ती परदेशामध्ये निर्यात होतात. तर चार लाखांहून अधिक गणेशमूर्ती संपूर्ण भारतात जातात. तथापि, युद्ध स्थितीम्ळे पेट्रोल, डिझेल व्यावसायिक गॅसचे दर वाढले.पर्यायाने वाहतुकीचा खर्चही वाढला.पूर्वी कर्नाटक, राजस्थान,अहमदाबाद याठिकाणी वाहनांना एकावेळी दहा हजार रुपये खर्च यायचा. पण आता १३ हजारांवर खर्च येत आहे.

# अखेर 'टीईटी'साठी बुरखा, हिजाब, ओढणीवरील बंदी रद्द

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे की,२८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेत उमेदवारांना बुरखा, हिजाब,ओढणी किंवा स्कार्फ वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, गैरप्रकार रोखण्यासाठी आणि सीसीटीव्ही पाहणीसाठी उमेदवारांचा चेहरा पूर्णपणे स्पष्ट दिसणे अनिवार्य करण्यात आले आहे.

याआधी टीईटीसाठी देणाऱ्या महिला परीक्षार्थीना बुरखा, हिजाब, दुपट्टा किंवा स्कार्फ परिधान करण्यावर बंदी घातली होती. परंतु या निर्णयावर सर्व स्तरावरून नाराजी व्यक्त येत होती. या ड्रेस कोडबाबत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे हा बंदी निर्णय मागे घेण्यात आला आहे.आता परीक्षार्थीना बुरखा, हिजाब किंवा दुपट्टा परिधान करता येईल, परंतु बायोमेट्रिक ओळख आणि सुरक्षेसाठी चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.सुरक्षेच्या कारणास्तव, परीक्षा केंद्रावर उपस्थित असलेल्या महिला कर्मचाऱ्यांमार्फत उमेदवारांची ओळख पडताळणी केली जाणार आहे.

# दोन विमानतळांना जोडणाऱ्या मेट्रो-८ साठी सल्लागार नेमणार

■ मुंबई

**नवी** मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळांना जोडणाऱ्या प्रस्तावित मेट्रो-८ मार्गिकेच्या उभारणीसाठी सिडकोने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. वन विभाग,सीआरझेड आणि इतर आवश्यक वैधानिक परवानग्या मिळवण्यासाठी सिडकोने सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कामासाठी सिडकोने प्रत्यक्ष निविदा मागविल्या आहेत.

हा सल्लागार करार १५ महिन्यांच्या कालावधीसाठी असणार आहे. तांत्रिक पात्रता आणि आर्थिक मूल्यमापन अशा दोन-लिफाफा पद्धतीने हा करार सुपूर्द केला जाईल. सिडकोने या निविदेसाठी इसारा रक्कम २.६८ लाख रुपये निश्चित केली आहे.

सिडकोकडून प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया सुरू

दोन्ही विमानतळांमध्ये थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी प्रदान करणे हे मेट्रो मार्गिका ८ चे उद्दिष्ट आहे. हा मेट्रो-८ मार्ग ३५ किलोमीटरचा आहे. या मार्गावर एकूण २० स्थानके प्रस्तावित आहेत. त्यामध्ये भूमिगत मार्गावर ६ स्थानके असतील.भूमिगत विभाग मुंबई विमानतळाला एलबीएस मार्ग, कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि घाटकोपर पूर्व या प्रमुख ठिकाणांशी जोडेल आणि छेडा नगरजवळ बाहेर पडेल.

# बिहारमधील तडे पडलेला रस्ता कामगारांनी शिवला

■ पाटणा

**बिहारमधील** आरा-बक्सर मार्गाला मोठ्या भेगा पडल्या. त्या कामगारांनी चक्क लोखंडी सळ्या आणि हातोड्यांचा वापर करून अजब पद्धतीने बुजवल्या. ही पद्धत एखादा कपड्याला टाके मारुन शिवल्याप्रमाणे दिसत होती. या प्रकाराचा व्हिडोओ व्हायरल झाला. या अत्यंत अजब पद्धतीमुळे सध्या आश्चर्य आणि संताप व्यक्त केला आहे.

कामगारांनी भेगांजवळ ड्रिल मशीनने छिद्रे पाडली आणि नंतर दोन भाग जोडण्यासाठी जाड लोखंडी सळ्या ठोकल्या. ही पद्धत 'शिवल्या'प्रमाणे होती. या अजब प्रक्रियेला स्थानिकांनी 'रोड सर्जरी' असे नाव दिले आहे. या प्रकारामुळे नवीन बांधकामाच्या गुणवत्तेवर आणि देखभालीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नेटकऱ्यांनी यावर तीव्र आश्चर्य आणि संताप व्यक्त केला आहे. ही दुरुस्ती तात्पुरती मलमपट्टी आहे. यामुळे रस्ता कायमस्वरूपी मजबूत



होणार नाही, असा आरोप करत लोकांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# दाढीवाल्यांचे पालनपोषणही बाळासाहेबांच्या पाळणाघरातच झाले

संजय राऊतांचा पलटवार

■ मुंबई

**सध्या** ज्यांनी ५०-७५ कोटी रुपये खाऊन बाळासाहेबांच्या शिवसेनेशी गद्दारी केली आहे ते सर्व बाळासाहेबांच्याच पाळणाघरातून मोठे झाले आणि दाढीवाले शिंदेंचे पालनपोषणही बाळासाहेबांच्याच पाळणाघरात झाले, हे विसरू नका, असा जबरदस्त पलटवार उबाठाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी आज सकाळच्या पत्रकार



परिषदेत केला.

उबाठाच्या सहा खासदारांनी काल शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.त्याप्रसंगी बोलताना शिंदे गटातील नेते किरण पावसकर यांनी बाळासाहेबांच्या वक्तव्याची खिल्ली उडवली होती. बाळासाहेबांनी शिवसैनिकांना आणि शिवसेनेवर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेला उद्देशून एका व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून आवाहन केले होते. तुम्ही आजवर जसे मला सांभाळून घेतले तसेच उद्धव आणि आदित्यलाही सांभाळून घ्या, असे बाळासाहेब म्हणाले होते.

त्या व्हिडिओचा संदर्भ देत पावसकर यांनी महाराष्ट्र म्हणजे काय पाळणाघर आहे का, अशा शब्दांत खिल्ली उडवली होती.

# पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत विविध विषयांना मंजुरी

■ पनवेल


**पनवेल** महानगरपालिकेची महासभा आज महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये पार पडली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते. तर सभागृहात सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे तसेच महापालिका सदस्य उपस्थित होते. तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महापारेषण व्यवस्थापकीय संचालकपदी विक्रम कुमार

**मुंबई** - वरिष्ठ सनदी अधिकारी विक्रम कुमार यांनी आज महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे महापारेषणला अनुभवी, दूरदृष्टी असलेले आणि पायाभूत सुविधांच्या विकासात मोलाचा अनुभव असलेले नेतृत्व लाभले आहे. महाराष्ट्र कॅडरच्या २००४ बॅचचे आयएएस अधिकारी असलेले विक्रम कुमार यांना नागरी प्रशासन, पायाभूत सुविधा विकास, औद्योगिक प्रगती आणि सार्वजनिक प्रशासन क्षेत्रातील दोन दशकांहून अधिकचा अनुभव आहे.

## नवाकाळ शब्दकोडे-१६४६



**आडवे शब्द –**

१. उचापती करणारा ५. उदरनिर्वाह ७. वर्ण, मौज, बहार ९. स्त्री, बायको ११. उद्यान, बाग १२. भाकरीचे धान्य, नाचणी १३. आसरा, आश्रय १४. इतरांपेक्षा निराळा १७. शुक्राचार्यांचा प्रिय शिष्य १७. खारकेचे पूर्वरूप १८. दर वर्षी २१. रामाचा मुलगा २२. अनियंत्रित जमाव २३. भीतीने पछाडलेला २५. कल्हईसाठी वापरला जाणारा पदार्थ २८. तेव्हा, त्या वेळी ३०. सभा, बैठक ३२. वार्ता ३३. याग, यज्ञ ३५. शाहिराचे चर्मवाद्य ३६. मित्र, दोस्त ३८. भांडण ३९. तृतीया ४१. रामजन्माची तिथी ४२. कृश, लुकडा ४३. रसिकांचा प्रतिसाद, न्यायाची मागणी ४४. छत ४६. आसरा, आश्रय ४८. फुलझाडांचा ताटवा ४९. पुरुष ५१. दडपण ५३. पक्ष्यांचा समूह ५५. आयुष्य, जिवंत ५७. बाळाची काळजी घेणारी सेविका ५८. घोळका, मोठा समूह ६०. पुढे जाणे, वाटचाल करणे ६२. उजेड, प्रकाश ६३. राजपुत्राची, राजकन्येची आजी ६५. कटी ६६. गार, थंड ६८. झाड, वृक्ष ७०. माज ७२. साखरेचा रस ७३. काल्यांची चव ७५. आनंद, मोद ७६. सौम्य स्वरूपाचा प्रमाद ७७. झाडाचे पान ७८. पक्षी ७९. रानात पसरलेली आग ८१. खांबावर आडवी टाकलेली तुळई ८३. दयनीय ८५. प्रामाणिक ८६. राशिचक्रात उलट दिशेने जाणारा ग्रह ८७. टक्कल झाकणारा कृत्रिम केशकलाप ८८. धार्मिक व्रत ८९. बुंदीच्या लाडूंचा उंची प्रकार ९१. देवी ९२. रोपाच्या बुंध्याभोवती पाणी घालण्यासाठी केलेला खळगा ९३. मृत्तिका ९५. पतीचे वा पत्नीचे वडील ९७. फळातील गर ९८. गावाची वेस ९९. ताबडतोब १००. शत्रू, वैरी १०२. वर्षाचा बारावा भाग १०३. झणझणीत फोडणी दिलेले मुरमुरे १०४. आंब्याची उंची जात १०६. आसन ग्रहण केलेला १०९. बरोबर ११०. मोठा १११. बाणांचा भाता ११३. दरोडा ११४. श्रीकृष्णाचा पिता ११५. हलकी लाट ११६. मेंदी ११७. पावलांचा आवाज ११८. लिहितावाचता येणारा

**उभे शब्द –**

१. अकारण २. जहाजे लुटणारा ३. वजन करण्याचे साधन ४. निरुपयोगी लोकांची भरताड ५. गुंफा, घळ ६. थोडासा, अल्प ७. छंदीफंदीपणा ८. कंठ ९. अठरापैकी चौथे पुराण १०. मजला ११. फालतू बडबड १३. गांधीजींचे आंदोलन १५. लता, वल्लरी १७. पूर्ण अभाव १९. नम्र २०. अप्रीती, नापसंती २४. स्तुतीपर काव्य, स्तोत्र २६. स्वच्छता २७. रसास्वाद, आस्वाद २९. गुलामी ३१. दरारा, आदरयुक्त धाक ३४. नुकतेच जन्मलेले मूल ३७. खात्री करून घेणे ४०. समूह ४३. नवरा ४५. पलटण, तुकडी ४७. कबूल, तयार ४८. निर्विवाद ५०. महादेव ५२. कुवत ५४. हत्ती ५६. वीज ५९. आईचे वडील ६१. उसाचा रस काढण्याचे साधन ६४. गळ्याखालचे हाड ६५. स्त्रीचे हस्तभूषण ६६. मजकुराचा मथळा ६७. चिन्ह, खूण ६९. सुंदर स्त्री ७१. विश्वासघातकी ७२. पुनीत, पवित्र ७४. लहान मुलीची कर्णभूषणे ७८. पणन ८०. पूर्ण नुकसान, सत्यानाश ८२. सर्दीखोकल्यावर उपयोगी चहा ८४. कोरडा, शुष्क ८५. समोर ठाकलेला, पुढ्यात ८६. नवरदेव ९०. पूड, पावडर ९१. पत्नी ९२. खास स्वागत, सरबराई ९३. पिछाडीला ९४. प्रदेश, टापू ९६. आसरा, आश्रय ९७. देवीने वध केलेला एक राक्षस ९९. धांदल, घाई १०१. मोठा आवाज, स्फोट १०५. श्रीकृष्णाच्या जिवावर उठलेली मावशी १०६. स्पष्ट केलेले १०७. कोंदणात खडा बसवणे १०८. आसपास ११२. चहाचा पेला ११४. ऊर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६४५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अमित ४. नवरोज ७. सांबार ११. मृत १२. उठाठेव १३. जडजंबाल १५. संभावित १६. वापर १७. शिमगा १८. कलागत २०. नुकसान २२. काका २३. रथ २६.टर २७. माथा २८. भर २९. यवस ३२. डगमगणे ३५. वारू ३६. वडवानल ३८. बदल ४०. अवनती ४१. ईर ४२. यमुना ४४. बेशरम ४७. गढी ४९. सभा ५१. द्रवपदार्थ ५३. महती ५५. सुटका ५७. रेघ ५८. सत्वर ५९. कारकून ६०. अधेली ६२. अयोध्या ६४. काला ६६. मानव ६७. पराजय ६९. असामी ७१. ऐरावत ७२. वामा ७३. श्वान ७४. नवे ७६. बंदी ७७. पारा ८०. वर्णी ८१. भिस्त ८२. समंध ८४. कवडीचुंबक ८६. पाहुणे ८८. अज्ञ ८९. काकडा ९०. बढती ९१. उग्र ९२. मंतरलेले ९५. भोंगा ९६. बडदास्त ९८. मंगळ ९९. पद्य १००. परखड १०१. हवालदिल १०२. पोतडी १०५. लाभ १०७. गावकरी १०८. खोपट १०९ . करवादणे

**उभे शब्द :** १. अमृतानुभव २. मित ३. वठार ४. नवशिका ५. रोजगार ६. जड ७. सांबा ८. बालक ९. प्रभात १०. दंतकथा १२. उपनयन १४. जंत्री १५. संगर १६. वासा १९. लाटणे २१. करडई २२. कास २४. थड २५. क्षेम २७. मारूनमुटकून ३०. वलय ३१. मंद ३३. गजर ३४. गर्व ३५. वाव ३७. वारस ३८. बनाव ३९. लबेदा ४०. अढी ४३. मुद्रक ४५. शर्थ ४६. ममत्व ४७. गती ४८. वारेमाप ५०. भागधेय ५२. पक्क ५४. हरकारा ५५. सुरमा ५६. कानवला ५८. सध्या ६०. अजमावणे ६१. शिसा ६३. योद्धा ६५. लावण्यवती ६८. रावा ६९. अनभिज्ञ ७०. मीन ७१. ऐदी ७५. वेसकर ७६. बंध ७७. पाचुंदा ७८. राब ७९. खोपा ८३. मंडाले ८४. कढत ८५. कणगा ८७. हुल्लड ८८. अग्र ८९. कातळ ९१. उस्तवारी ९२. मंगल ९३. लेपडी ९४. करवंद ९५. भोंडला ९६. बडगा ९७. दाहक ९८. मंदिल १०२. पोप १०३. तट १०४. पौर १०६. भला

# मुंबईत ८०० चौफुच्या सदनिकांच्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देणार

■ मुंबई

**मुंबईतील** अनेक इमारतींना 'ओसी' म्हणजेच भोगवटा प्रमाणपत्र नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आता ८०० चौरस फुटांच्या सदनिका असलेल्या १७ नोव्हेंबर २०१६ पासूनच्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. यासाठी 'सुधारित भोगवठा अभय योजना' राबवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. या संदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीत मंजुरीसाठी मांडला जाणार आहे.

वास्तविक इमारतींचे बांधकाम नियमानुसार न करता वाढीव काम केले किंवा काही बदल केल्याचे निदर्शनास आले तर मुंबई महापालिका अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देत नाही. हे प्रमाणपत्र नसलेल्या इमारतीमधील रहिवाशांना दुप्पट मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि मलनिस्सारण कर भरावा लागतो. मात्र आता पालिकेने

**पालिका प्रशासन स्थायी समितीत प्रस्ताव मांडणार**

या निर्णयामुळे निदान ८०० चौरस मीटर क्षेत्रांच्या सदनिका असलेल्या इमारतींना 'भोगवटा प्रमाणपत्र' दिले जाणार आहे.यासाठी राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे अभय योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नियमावलीचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे.

# मुंडेंच्या धसक्याने त्र्यंबकेश्वर मंदिरातील लाडू विक्री बंद?

■ त्र्यंबकेश्वर

**त्र्यंबकेश्वर** मंदिर प्रशासनाने अचानक प्रसादाच्या लाडवाचे वाटप पूर्णपणे बंद केले आहे. सुरवातीला भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षित स्मारक परिसरात परवानगीशिवाय व्यापारी पद्धतीने लाडू विक्री करण्यास आक्षेप घेतला होता. त्यानंतर, एफडीएच्य नियमांमुळे आणि आयुक्त तुकाराम मुंडेंच्या कारवाईच्या धसक्याने हे वितरण थांबवण्यात आल्याचे बोलले जात आहे.

त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने मुटकुळ्याचे लाडू प्रसाद म्हणून देण्यासाठी निविदा सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र चेअरमन म्हणून सहधर्मदाय आयुक्त यांनी कारभार हाती घेण्यापर्वी देवस्थान ट्रस्टने सध्या बुंदीच्या लाडूचा प्रसाद पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराला तीन महिन्यांची मुदतवाढ दिलेली होती. मात्र राज्यात तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईनंतर अचानक त्र्यंबकेश्वर मंदिरात मिळणारा लाडू प्रसाद विक्री बंद करण्यात आली आहे.

# टेक्सासमध्ये घरातून गणेश मूर्ती काढण्यास भारतीयाला भाग पाडले

■ टेक्सास

**अमेरिकेतील** टेक्सास राज्यात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या व्यक्तीला आपले घर विकण्यासाठी रिअल इस्टेट एजंटच्या सल्ल्यानुसार घरातून गणपतीची मूर्ती आणि इतर हिंदू धार्मिक चिन्हे काढावी लागली. संभाव्य खरेदीदारांवर याचा नकारात्मक प्रभाव पडू नये आणि घर सहज विकावे, यासाठी त्यांना हे पाऊल उचलावे लागले.

रवी वविलाला दोन दशकांपूर्वी एच-१बी व्हिसावर अमेरिकेत आले होते आणि आता अमेरिकेचे नागरिक आहेत. घर विक्रीसाठी काढले असता रिअल इस्टेट एजंटने त्यांना घर सर्वसामान्य दिसावे, यासाठी सर्व वैयक्तिक आणि धार्मिक वस्तू हटवण्याचा सल्ला दिला. या सूचनेनुसार त्यांनी गणपतीची मूर्ती आणि इतर धार्मिक वस्तू जवळच्या स्टोरेज युनिटमध्ये हलवल्या. एजंटच्या या सल्ल्यानंतर अमेरिकेत भारतीय आणि हिंदू समुदायाला मिळणाऱ्या वागणुकीबद्दल आणि वाढत्या स्थलांतरविरोधी भावनेबद्दल एक मोठी चर्चा सुरू झाली. टेक्सासच्या अनेक भागांत भारतीय वंशाच्या लोकांच्या वाढत्या संख्येमुळे काही स्थानिक लोकांमध्ये असंतोष पसरत आहे.

# राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समितीची स्थापना

पान १ वरून - त्यावर बोलताना त्या म्हणाल्या की तीन तलाकवर बंदी आणल्यावरही मुस्लीम महिलांचा त्यासाठी छळ होत आहे. मिनाझ, शबाना, रोझमीन या तीन महिला पीडित आहेत. त्यांना मी पोलिसांकडे नेऊन न्याय मिळवून दिला. पाकिस्तानात बहुपत्नित्व १ टक्का आहे, पण इथे सुरूच आहे. माझा सरकारला सवाल आहे की, समान नागरी कायदा आणणार का? बहुपत्नित्व बंद करणार का? तलाक दिलेल्या मुस्लीम महिलेच्या मुलांचे संगोपन कोण करणार? यावर मुंबईच्या राष्ट्रवादीच्या आमदार सना मलिक संतापून म्हणाल्या की, पाकिस्तानबाबत इथे बोलायची गरज नाही. आम्ही कुराण मानतो आणि तिथेही तेच मानतात. तुम्ही मुस्लीम बहुपत्नित्वाबाबत बोलता, इतर धर्मातही एकाहून जास्त विवाह होतात. या वक्तव्यावर गदारोळ झाल्यानंतर गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की समान नागरी कायदा हा कुणा एका धर्मासाठी नसून सर्व धर्मांना लागू होणार आहे.


## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **नेस्ले इंडिया लिमिटेड**च्या दप्तरी **श्रीमती कृष्णाबाई सी. कदम** आणि **श्री. चंद्रराव जी. कदम** यांच्या नावे असलेले, विशिष्ट क्र.९६२०५५०९१ ते ९६२०५६९९० असलेले १९०० शेअर्सचे फोलीओ क्र. के-१९ आणि भाग प्रमाणपत्र क्र.७५४ हरवले/गहाळ झाले असून, जाहिरातदाराने त्याऐवजी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

कोणा व्यक्तीस सदर शेअर्सवर कोणताही दावा असल्यास त्यांनी या सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आपला दावा कंपनीचे निबंधक व हस्तांतरण प्रतिनिधी मे.अलंकित असाइनमेंट्स लिमिटेड, अलंकित हाऊस, ४ई/२, झंडेवालन एक्स्टेन्शन, नवी दिल्ली – ११००५५ यांच्याकडे सादर करावा, अन्यथा, कोणताही पुढील संदर्भ न घेता कंपनी सदर समभागांबाबत दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करेल.

**सही/-**
भागधारकांची नावे:
**१) श्रीमती कृष्णाबाई सी. कदम**
**२) श्री. चंद्रराव जी. कदम**
दिनांक: २४.०६.२०२६
ठिकाण: मुंबई


पान १ वरून

# फुटीर खासदारांची पूर्ण पोलखोल!

केला. पण १३५ पैकी फक्त २ कामे केली. त्यांचा १३ कोटी ९८ लाख रुपयांचा निधी पडून आहे. हिंगोलीचे नागेश पाटील आष्टीकर यांना मंजूर झालेल्या १९ कोटी २ लाख रुपये निधीपैकी ५ कोटी २ लाख रुपये खर्च केले आहेत. ७९ पैकी त्यांनी २८ कामे केली असून त्यांच्याकडे १३ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी शिल्लक आहे. यवतमाळ-वाशिमचे संजय देशमुख याचा मंजूर निधी १८ कोटी ६० लाख रुपये असून प्रत्यक्ष खर्च १ कोटी ४१ लाख रुपये झाला आहे. त्यांनी १०६ पैकी ७ पूर्ण केलेली असून १७ कोटी १४ लाख रुपये निधी शिल्लक आहे. परभणीचे संजय जाधव यांनी मंजूर निधी १४ कोटी ७० लाख रुपये आहे. या निधीपैकी प्रत्यक्ष ३ कोटी ७८ लाख रुपये निधी वापरला आहे. १० कोटी ९१ लाख रुपयांचा निधी वापराविना शिल्लक आहे. सर्वात मोठी तफावत ईशान्य मुंबईचे संजय दिना-पाटील यांच्या विकासनिधीबाबत आहे. त्यांना १४ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यांनी केवळ ५ लाख ५९ हजार रुपयांचा खर्च केला. ४० कामांपैकी त्यांनी एकही काम पूर्ण केले नाही. त्यांच्याकडे १४ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी शिल्लक आहे.

या निधी वापराची माहिती जाहीर होताच विरोधकांनी बंडखोर खासदारांवर टीकेची झोड उठवली. उबाठाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, निधीसाठी पक्ष सोडून गेलो असे म्हणणार्यांचे आकडे समोर आले आहेत. मतदारांसाठी जो निधी दिला तो धड वापरू शकलेले नाहीत. १५-१६ कोटींचा निधी पडून आहे. हा विकासकामांचा निधी आहे. तो निधी का वापरला गेला नाही? आता कोणत्या निधीसाठी? कोणत्या विकासासाठी गेला आहात?

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, निधी मिळूनही खर्च केलेला नाही. तरीही निधी मिळत नाही अशी बोंब मारणे चुकीचे आहे. या खासदारांना शासकीय निधी मिळत होता. परंतु वैयक्तिक निधी मिळत नव्हता, असा त्यांच्या म्हणण्याचा रोख असावा. तर शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के बंडखोर खासदाराची बाजू घेताना म्हणाले की, एका खासदाराला वर्षाला ५ कोटींचा निधी मिळतो. त्यातील ५० लाख जीएसटीत जातात. बरचसे खासदार चौथ्या किंवा पाचव्या वर्षात कामे करायला सुरुवात करतात. १५-१६ कोटींचा निधी एकत्र जमला की एकदम काम करतात. म्हणजे लोकसभा मतदारसंघातील, सर्व विधानसभा मतदारसंघातील कामे करता येतात. सगळ्यांना न्याय मिळावा म्हणून हे असे केले जाते. ही तांत्रिक गोष्ट आहे, समजून घ्या.

# मराठी भाषा निधनाचाच शोकप्रस्ताव राज ठाकरे नार्वेकरांवर संतापले

पान १ वरून

अवस्था तेलही गेले, तूपही गेले, हाती आलं धुपाटणे अशी झाली आहे. काल नार्वेकरांनी आशाताईंच्या निधनाचा नाही तर मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला आणि त्यावर एकाही सदस्याने ब्र देखील न काढून या शोकप्रस्तावाला जणू संमतीच दिली.

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सत्ताधारी पक्षांवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, सभागृहात देवेंद्र फडणवीस उपस्थित होते का माहीत नाही, पण असते तरी मला वाटत नाही त्यांना काही फरक पडला असेल. गुलाबी आंखे जो तेरी देखी सारखी अनेक गाणी ( स्वतः निर्माण केलेल्या बेसुरात) म्हणणाऱ्या फडणवीसांना आज आपल्या राज्यात विधानसभेत कोणत्या महान व्यक्तीला आपण श्रद्धांजली अर्पण करणार आहोत आणि त्याचे गांभीर्य काय असते हे समजायला हवे होते. एकनाथ शिंदेंना पण याच्याशी घेणेदेणे असण्याचे काहीच कारण नाही. मराठी भाषेबद्दलच्या अभ्यासाचे त्यांचे विमान पन्नास हजार फुटावरून चालते. म्हणून त्यांचा पण दूर दूरपर्यंत संबंध नाही.

नार्वेकर ज्या अलिबागमधून येतात त्या अलिबागचे दत्तात्रय काशिनाथ कुंटे विधानसभेचे अध्यक्ष होते, अरुणभाई गुजराथी होते, बाळासाहेब भारदे होते, अगदी आत्ता आता अध्यक्ष असलेले दिलीप वळसे पाटील होते. अशी अध्यक्षांची परंपरा कुठे आणि सध्याची काय ही अवस्था?


## PUBLIC NOTICE

To know you all by this Public Notice, I hereby inform you all that land bearing CTS No. 1037, admeasuring 1295.99 Sq. Mtrs. & land bearing CTS No. 1050, admeasuring 157.20 Sq. Mtrs. total admeasuring 1453.19 Sq. Mtrs. in the revenue Village Malonde (Vasai), Vasai West, Taluka Vasai, District Palghar is in the name of Mrs. Asma Saleem Thara and Others. My clients have executed a registered Development agreement in the name of M/s. Skyline Constructions with Mrs. Asma Saleem Thara, M/s. Saar Construction and Others. My clients being the Developers are in verge of submitting the application before Town Planning Authority of Vasai Virar City Municipal Corporation for Development Permission.

By this Public Notice I hereby invite objections of any person/institute/firm/company who is/are having interest in the said property by way of Gift, Agreement, Conveyance, Easmentary rights, possession, tenancy or any type of right. I hereby declare that any person/institute/firm/company having any type interest in the said property should forward his/her/their objection in writing along with the relevant documents to the below mentioned address within 14 days from publication of this Public notice failing which we shall hold and presume that there is no claim of any type and if any such rights or claims exist are deemed to have been waived and no objection shall be considered. Please note.

**Sd/-**
**Advocate Anish Kalvert**
Shop No. 1, Sahayog CHSL, Near Kalimata Mandir, Diwanman, Vasai (W), Tal. Vasai, Dist. Palghar - 401202.
Place: Vasai Date: 24.06.2026



## जाहीर सूचना

माझ्या अशिलांच्या वतीने सर्वांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मी, **श्रीमती रतनदेवी के. मेहता** यांच्या हक्क, शिर्षक आणि हितसंबंधांची चौकशी करत आहे, त्या निवासी फ्लॅट असलेल्या फ्लॅट क्र.२बी, मोजमाप सुमारे ५४७ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र, २ऱ्या मजल्यावर, **वीणा हॅपी होम अपार्टमेंट को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड** म्हणून ज्ञात सोसायटीतील **हॅपी होम अपार्टमेंट** म्हणून ज्ञात इमारतीत, २८ए, नेपियन सी रोड, मुंबई-४०० ००६ चे सध्याचे मालक आहेत, तसेच त्यांच्यासोबत **वीणा हॅपी होम अपार्टमेंट को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड**ने जारी केलेले भाग प्रमाणपत्र, ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| भाग प्रमाणपत्र क्र. | शेअर्सची संख्या | विशिष्ट पासून | विशिष्ट ते |
|---|---|---|---|
| ८ | ५ | ३६ | ४० |

(यापुढे **'सदर प्रिमायसेस'** म्हणून संदर्भित) ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खाली लिहिलेल्या अनुसूचीत दिले आहे.

जर कोणा व्यक्तिस सदर जागेवर गहाण, धारणाधिकार, बक्षिस, भाडेपट्टा, परवाना, वहिवाट, वारसा हक्क, भागीदारी आणि/किंवा कोणत्याही स्वरूपाचे बोजे या स्वरूपात कोणताही दावा, हक्क, शिर्षक आणि हितसंबंध असल्यास, तर त्यांनी कृपया ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर वकिलाला त्यांच्या दाव्याबद्दल कळवावे, अन्यथा तो दावा माझ्या अशिलांच्या बाजूने सोडून दिलेला आणि/किंवा त्याग केलेला मानला जाईल.

**येथे वर संदर्भित अनुसूची:**
**(सदर प्रिमायसेसचे वर्णन)**

**हॅपी होम अपार्टमेंट** म्हणून ज्ञात इमारतीमधील २ऱ्या मजल्यावर असलेला मोजमाप सुमारे ५४७ चौ.फूट बिल्ट अप क्षेत्रफळाचा फ्लॅट क्र.२बी, सोबत **वीणा हॅपी होम अपार्टमेंट को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड** द्वारे जारी केलेले, एकत्रित भाग प्रमाणपत्र क्र.८ नुसार, विशिष्ट क्र.३६ ते ४० (दोन्ही समाविष्ट) असलेले ५ पूर्णतः भरणा केलेले शेअर्स, ही मालमत्ता मलबार आणि कंबाला हिल विभागाचा सी.एस. क्र.५८७ असून ती नेपियन सी रोडच्या पश्चिम बाजूस, मुंबई - ४०० ००६ येथे स्थित आहे.

**श्रीमती मनीषा कापाडिया**
**वकील उच्च न्यायालय**
गोविंद इमारत, १ला मजला, १४०, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई- ४०० ००२


# लोढांना गिरगावात मांसाहार बंद करायचा आहे

पान १ वरून- मांसाहार बंद करायचा आहे. गिरगाव चौपाटीवरील कोळी बांधवांचा रोजगार सध्या शेवटच्या घटका मोजत आहे. पारंपरिक मासेमारी कमी होत चालली आहे. त्यामुळे त्यांना रोजगाराचे दुसरे साधन उपलब्ध व्हावे. चौपाटीवर सध्या प्रामुख्याने भेळ, पावभाजी यांसारखे शाकाहारी पदार्थ उपलब्ध आहेत. त्यामुळे मांसाहारी पर्यटकांची गैरसोय होते. कोळी बांधवांना मासे, चिकन, मटन यांचे पदार्थ विक्रीसाठी स्टॉल मिळाल्यास त्यांच्या रोजगाराला हातभार लागेल. दरम्यान, बोटी हटवण्याच्या कारवाईविरोधात कोळी बांधव आक्रमक झाले असून 'आम्ही इथून जाणार कुठे?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

# राज्यभरात पावसाची दमदार हजेरी

पान १ वरून

त्रस्त असलेल्या मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला. मागील चोवीस तासात हवामान केंद्राच्या कुलाबा येथे ४९ मिमी पावसाची तर सांताक्रूझ येथे १२.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

कोकणातही जूनच्या सुरुवातीला थोडाफार बरसून दडी मारलेल्या पावसाचे पावसाचे दमदार पुरागमन झाले असून, उन्हामुळे करपू लागलेल्या भात रोपांना या पावसामुळे नवसंजीवनी मिळाली. देवगड १२६ मिमी,कुडाळ १०३ मिमी, वैभववाडी ९७ मिमी, कणकवली ९० मिमी, सावंतवाडी ८७ मिमी, दोडामार्ग ८० मिमी, मालवण ३४ मिमी, वेंगुर्ला ३० मिमी पावसाची नोंद झाली. सावंतवाडी बाजारपेठेत रस्त्यावर पाणी तुंबले. पुण्यात जुन्नर तालुक्यातील कुमशेत परिसरात मुसळधार पाऊस झाला. या मुसळधार पावसामुळे रस्ते, ओढे आणि नाल्यांना नद्यांचे स्वरूप आले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. माळशेज घाट ते आळे-फाटा परिसरातही जोरदार पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध भागांत मुसळधार पावसामुळे सय्यदपूर (लाडसावंगी) आणि भिलदरी -शफियाबाद (कन्नड तालुका) येथील पूल वाहून गेला. याशिवाय जिल्ह्यातील एकूण ४ लहान पूल अतिवृष्टीमुळे वाहून गेले होते, ज्यामुळे गावकऱ्यांचा संपर्क तुटला.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER 1st CALL NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works

| Sr. No. | RFx No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040463 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-15 (1st call)/26-27** E-Tender for Work of providing and fixing of Non-conductive Turbo Wind Driven Conical Bird Guards at various Suspension Tower & Pilot locations of 220kV & 100kV Lines of EHV LMSD, Kalwa under EHV (O&M) Division, Kalwa. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From **Dt. 24.06.2026, 00:00 Hrs. to Dt. 09.07.2026, 09:59 Hrs.** **Technical Opening :- Dt. 09.07.2026 at 10:00 Hrs.** (Onwards if possible) **Commercial Opening :- Dt. 09.07.2026 at 15:00 Hrs.** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 99,06,235.42/-** |

**Contact Person:-** Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 7506379055
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**

# नवाकाळ




## स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न! प्रस्ताव केंद्राला पाठवलाच नाही



**मुंबई** - आज विधानसभेत भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्वत:च्या सरकारलाच अडचणीत आणले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करावा हा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला अद्याप का पाठविला नाही? असा सवाल त्यांनी सभागृहात केला. मुनगंटीवार म्हणाले की, २०१९ साली भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्यात हा प्रस्ताव विधानसभेत मांडण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर ७ मार्च २०२६ या दिवशी विधानसभेत आश्वासन देण्यात आले की, हा प्रस्ताव मांडला जाईल आणि केंद्राकडे पाठवला जाईल. मी केंद्रात चौकशी केली तेव्हा असा कोणताही प्रस्ताव आलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा हा प्रस्ताव का मांडला जात नाही? मंत्र्यांची इच्छा असूनही अधिकारी अडवणूक करीत आहेत का? हा माझा सवाल आहे. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, आपल्याकडे आश्वासन समिती आहे, त्या समितीकडे आपण चौकशी करा आणि तिथे काही झाले नाही तर मी तुम्हाला हक्कभंग मांडण्याची परवानगी देईन, पण आधी आश्वासन समितीकडे जावे लागेल.

## आजी, खिचडी आणि केळी

**मी एक डिलिव्हरी बॉय आहे. संध्याकाळची शिफ्ट माझी रोजची. त्या दिवशी रात्री सुमारे नऊच्या सुमारास शेवटची ऑर्डर घेतली. रेस्टॉरंटमधून पॅकेट घेताना लक्षात आलं- छोटीशी ऑर्डर साधी खिचडी, दही आणि दोन केळी.**

**पत्ता** शहराच्या जुन्या भागातला. जुनाट इमारत. तिसरा मजला. दरवाजाची बेल वाजवली. दरवाजा उघडला एका वृद्ध माऊलीने-

पांढरे केस, थरथरणारे हात, जाड काचा असलेला चष्मा.

चेहऱ्यावर थकवा होता, पण आवाजात मायेची गोडी -

बाळा, आत ठेव ना हात थरथरतात. मी जेवण टेबलावर ठेवलं. निघणार होतो, तेवढ्यात ती म्हणाली-

दोन मिनिटं बसशील का?

एकटं खायला बरं वाटत नाही

घड्याळ पाहिलं. शिफ्ट संपली होती.

थकलो होतो, पण कळलं नाही का- मी बसलो. घरात शांतता. भिंतीवर जुनं घड्याळ टिक-टिक करत होतं. एका कोपऱ्यात देवाचं छोटं चित्र आणि समोरच्या



भिंतीवर आठवणींचे फोटो.

तिने खिचडीची प्लेट उघडली.

हळूहळू खायला सुरुवात केली.

दोन घासांनंतर माझ्याकडे बघून हसत होती. ती म्हणाली- बाळा, मी रोज बाहेरचं मागवत नाही.

आज फक्त माणसाचा आवाज ऐकावा म्हणून.

मी शांत. तिने फोटो दाखवला-

हे माझे मिस्टर रेल्वेत होते.

पाच वर्षांपूर्वी गेले दुसरा फोटो-

हा माझा मुलगा. कॅनडात असतो.

खूप छान आहे दर महिन्याला पैसे पाठवतो.

क्षणभर थांबली

डोळ्यांत पाणी दाटलं फक्त वेळ पाठवत नाही. घड्याळाची टिक-टिक अचानक मोठी वाटू लागली.

ती पुढे म्हणाली, ही माझी मुलगी. बंगळुरूमध्ये. तिच्या जगात खूश आहे. असायलाच हवी. मुलं उडली नाहीत तर वाढवण्याचा अर्थ काय?

आवाज तुटत होतापण चेहऱ्यावर तक्रार नव्हती, फक्त रिकामेपण.

तिने विचारलं, तुझी आई आहे का?

हो

दररोज फोन करतोस?

मी गप्प.

खरं तर मीही दिवसेंदिवस फोन करत नसे.

काम, थकवा उद्या करू म्हणत पुढे ढकलत राहायचो. तिने माझं मौन ओळखलं. हळूच म्हणाली, आई-बाप पैसे मोजत नाहीत बाळा

ते आवाज मोजतात.

मनात काहीतरी तुटलं.जेवण संपलं.

तिने पाणी पिलं. पर्समधून ५०० रुपये काढून माझ्याकडे दिले. ही टिप नाही.

त्या अर्ध्या तासाची किंमत आहे, जेव्हा तू मला एकटं खाऊ दिलं नाहीस. मी नकार दिला, नको, आई मी घेऊ शकत नाही.

ती हसली, घेआज तू जेवण नाही दिलंस, सोबत दिलीस. मी पैसे घेतले, पण खिशात ठेवले नाहीत.

हातातच घट्ट धरून ठेवले. निघताना ती म्हणाली, आणि हो,

आज घरी जाऊन आईला नक्की फोन कर.

त्या रात्री मी बाईक सुरू केली नाही.

सर्वात आधी आईला फोन केला. तिथून आवाज आला, अचानक फोन? सगळं ठीक आहे ना? ते ऐकताच गळा दाटून आला, मी म्हणालो, हो आई. फक्त तुझा आवाज ऐकायचा होता.

क्षणभर शांतता, मग आईचा प्रश्न, जेवलास का? आणि मी रस्त्यावर उभा राहून रडलो. त्या दिवसानंतर मी रोज आईला फोन करायला लागलो.

आणि डिलिव्हरीची फक्त ऑर्डर राहिली नाही. काही घरांना औषध लागतं, काहींना एकटेपणातून सुटका, काहींना प्रतीक्षेचा शेवट

आणि काहींना फक्त आवाज.

आता दार उघडलं की, मी घाई करत नाही. चेहरा बघतो आवाज ऐकतो,

कधी विचारतो- बाकी सगळं ठीक ना?

बहुतेक जण हो म्हणतात

काही हसतात आणि काही चेहरे सांगतात, आज दिवसभर कुणाशी बोललेलेच नाहीत.

दोन महिन्यांनी पुन्हा त्याच पत्त्याची ऑर्डर आली. मी धावत गेलो.

दार उघडलं, पण ती नव्हती. शेजारच्या काकूंनी शांतपणे सांगितलं, आई गेल्या आठवड्यात गेली

मी काही क्षण तसाच उभा.

हात रिकामे पण मनात काहीतरी कोसळलं.

त्या काकूंनी एक लिफाफा दिला-

तुझ्यासाठी ठेवून गेल्या.

कापऱ्या हातांनी उघडलं.

आत ५०० रुपये

आणि एक चिठ्ठी-

बाळा,

हे वाचत असशील तर मी गेले आहे.

त्या दिवशी माझ्यासोबत बसलास- धन्यवाद.

तू मला अन्न नाही दिलंस

सन्मान दिलास.

आणि हो-आईला फोन करत रहा.

- आई

आजही ते ५०० रुपये माझ्या बॅगेच्या आतल्या खिशात आहेत.

मी ते खर्च केले नाहीत.

कारण त्या रात्री मला कळलं-

प्रत्येक दारामागे ग्राहक नसतो

कधी आई असते

कधी प्रतीक्षा

कधी शेवटची भेट.

आपण सगळे भुकेले आहोत-

कुणाला अन्नाची भूक

कुणाला औषधाची

आणि कुणाला दोन क्षणांच्या सोबतीची.

माणसाला नेहमी पैशांची डिलिव्हरी लागत नाही-

कधी कधी

उपस्थितीची डिलिव्हरी पुरेशी असते.

पण मनातली जडता मात्र संपली नाही

वृद्धत्व आणि एकटेपण-

हे दोन्ही जेव्हा एकत्र येतात, तेव्हा आयुष्य फार कठीण होतं.

आणि त्यातच जर अभावाची छाया सामील झाली-

तर ती खरी शोकांतिका ठरते आहे.

## टाटा ईलेक्ट्रॉनिक्सवर सायबर हल्ला ऑपल-टेस्ला संबंधित कागदपत्रे लीक

■ नवी दिल्ली

**टाटा** समूहाची उपकंपनी असलेल्या टाटा ईलेक्ट्रॉनिक्सला मोठ्या सायबर हल्ल्याचा फटका बसला आहे. वर्ल्ड लीक्स या रॅन्समवेअर गटाने कंपनीच्या प्रणालीमधून मोठ्या प्रमाणावर गोपनीय डेटा हस्तगत करून तो डार्क वेबवर प्रसिद्ध केल्याचे म्हटले आहे. या कथित डेटा लीकमध्ये ॲपल व टेस्ला या टाटा ईलेक्ट्रॉनिक्सच्या महत्त्वाच्या ग्राहकांशी संबंधित संवेदनशील कागदपत्रे, तांत्रिक आराखडे आणि डिझाईन फाईल्सचा समावेश असल्याचा दावा करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षा संशोधकांच्या माहितीनुसार, हॅकरने सुमारे ६३० जीबी आकाराचा डेटा लीक




केल्याचा दावा केला असून, त्यात २ लाख ४ हजारांहून अधिक फाईल्स आणि फोल्डर आहेत. या डेटामध्ये ॲपलच्या आयफोनशी संबंधित सर्किट बोर्ड डिझाइन, उत्पादन प्रक्रिया, टेस्लाच्या अभियांत्रिकी प्रकल्पांशी संबंधित तांत्रिक माहिती तसेच काही कर्मचाऱ्यांच्या दस्तऐवजांचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे. वर्ल्ड लीक्स या कुख्यात रॅन्समवेअर टोळीने या सायबर हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्याचा दावा केला आहे. यापूर्वीही या गटाने अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांवर सायबर हल्ले केले होते. डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी आणि लीक झालेला डेटा हटवण्यासाठी हॅकर्सनी खंडणीची मागणी केल्याचे वृत्त आहे.

## गोरेगाव पूर्वेतील आरे रुग्णालय मुंबई पालिका ताब्यात घेणार

■ मुंबई

**गोरेगाव** (पूर्व) येथील आरे रुग्णालय पुढील ३० वर्षांच्या भाडेकरारावर मुंबई महापालिका प्रशासन ताब्यात घेणार आहे. तसा पालिकेने प्रस्ताव तयार केला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास सध्या केवळ ओपीडी स्वरूपात सुरू असलेल्या या रुग्णालयाचा कारभार आता पालिका पूर्णपणे चालवणार आहे.

आरे वसाहतीत असलेले हे रुग्णालय मुळात तेथील डेअरीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात आले होते. परंतु सध्या डेअरीतील कर्मचाऱ्यांची संख्या कमालीची घटून ती ६०० वरून ६५ वर येथून ठेपली आहे. त्यामुळे या रुग्णालयाचा वापर कमी झाला आहे. त्याचदरम्यान आता हे रुग्णालय आता पालिका चालवायला घेणार आहे. गोरेगाव आरे दुग्ध वसाहतीच्या हद्दीत आरे न.भ.क्र. ३८,आरे रुग्णालयाची इमारत आहे. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ हे १२५७.९० चौ.मीटर एवढे आहे. यात संलग्न शासकीय निवासस्थानांचे क्षेत्र ६७४.३० चौ.मीटर असे एकूण क्षेत्रफळ १९३२.२० चौ.मीटर एवढे क्षेत्र जसे आहे तशा स्थितीत घेण्यात येणार आहे.

## विधान परिषद पराभवानंतर मविआची आज महत्त्वाची बैठक

■ मुंबई

**राज्यातील** बदलत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची उद्या २४ जून रोजी महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीत उद्धव ठाकरे, शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह मविआतील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, विविध प्रलंबित प्रश्न आणि आगामी राजकीय घडामोडी यावर या बैठकीत सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे. विधान परिषद निवडणुकीत मविआने खाते उघडले नाही, उबाठाच्या सहा खासदारांच्या पक्षांतरानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. याशिवाय पावसाळी अधिवेशनात सरकारविरोधात कोणते मुद्दे आक्रमकपणे मांडायचे, विरोधकांची भूमिका काय असावी, महाविकास आघाडीतील समन्वय अधिक मजबूत करण्याबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे.

## मंत्री अनुपस्थितीवरून गदारोळ आदित्य ठाकरेंकडून सभात्याग



■ मुंबई

**विधानसभेत** आज मंत्र्यांच्या अनुपस्थितीच्या मुद्द्यावरून आणि त्यांच्या वतीने इतर मंत्री अथवा राज्यमंत्र्यांना प्रश्नांची उत्तरे देण्याचे अधिकार देण्याच्या निर्णयावरून गदारोळ झाला. या मुद्द्यावर विरोधकांनी आक्षेप नोंदवला. उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेले स्पष्टीकरण अमान्य करत सभात्याग केला.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी २०१९ आणि २०२० या कालावधीतही अशा प्रकारे मंत्र्यांच्या वतीने उत्तरे देण्याची पद्धत अवलंबल्याचा दावा केला. पण हा दावा चुकीचा असल्याचे सांगत आदित्य ठाकरे यांनी अध्यक्षांनी संबंधित नोंदी तपासाव्यात, अशी मागणी केली. मंत्र्यांना प्रश्नांची उत्तरे देता येत नसतील तर त्यांनी ते स्पष्टपणे मान्य करावे, असेही ते म्हणाले. या मुद्द्यावरून सभागृहात आदित्य ठाकरे आणि मंत्री शंभूराज देसाई यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. यावेळी देसाई यांनी अध्यक्षांनी नियमांनुसारच कामकाजाचे वाटप केल्याचे सांगत महाविकास आघाडी सरकारच्या काळातही अशाच पद्धतीचा अवलंब झाल्याचा दावा केला. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सभागृहात किती प्रश्नांना उत्तरे दिली, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विरोधकांच्या सभात्यागानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात विरोधकांवर आणि विशेषतः उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, कालच त्यांना एक 'जोर का झटका' लागला आहे, त्यामुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे.

## के.ई.एम.च्या नामांतरावरून विधान परिषदेत खडाजंगी

■ मुंबई

**परळ** येथील के.ई.एम. रुग्णालयाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव पुन्हा एकदा राजकीय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई महानगरपालिकेकडे पाठवलेल्या या प्रस्तावावरून विधान परिषदेत जोरदार खडाजंगी झाली.

उबाठाचे आमदार मिलिंद नार्वेकर म्हणाले की, मुंबईत जेव्हा प्लेगची भीषण साथ आली होती, तेव्हा किंग एडवर्ड यांनी दिलेल्या निधीतून या रुग्णालयाची उभारणी केली. मग किंग एडवर्ड या व्यक्तीवर सरकारचा इतका राग का आहे? ते काही अतिरेकी नव्हते की ज्यांच्या नावाचे रुग्णालय तातडीने बदलले पाहिजे. पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हे नाव बदलून 'कौशल्य एकलव्य मेमोरियल रुग्णालय' असा प्रस्ताव दिला आहे. हे नामांतर करण्याचा हा आटापिटा नेमका कशासाठी सुरू आहे? आमदार सचिन अहिर म्हणाले की, पालकमंत्र्यांना जर नामांतराची इतकीच हौस असेल, तर त्यांनी त्यांच्या 'ट्रम्प टॉवर'चे नाव बदलायला हवे होते. यावर उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, नामांतराबाबतचा प्रस्ताव आला असला, तरी त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. या विषयाची कायदेशीर, ऐतिहासिक आणि प्रशासकीय स्तरावर सखोल तपासणी करण्यात




येणार आहे. केईएम रुग्णालयाचे नाव बदलावे किंवा बदलू नये, अशा दोन्ही बाजूंची मते सरकारकडे आली आहेत. मात्र, सर्व बाबींचा विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल.

## शिवसेना मुंबईत नवीन सेनाभवन उभारणार

■ मुंबई

**मुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून मुंबईत स्वतंत्र आणि भव्य 'सेनाभवन' उभारणार आहे. या नव्या 'सेनाभवना'साठी दोन ठिकाणांची पाहणी करण्यात आली असून, दादर परिसराला पक्ष नेतृत्वाकडून अधिक पसंती मिळत असल्याची माहिती आहे. याबाबत मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, नवीन शिवसेना भवन उभारणे हे आमचे ठाम उद्दिष्ट आहे. एकनाथ शिंदे यांचे ते स्वप्न असून, मुंबईत दादरमध्ये ते असावे, असा संकल्प आहे. केवळ मुंबईच नव्हे तर मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि खानदेश येथेही पक्षाची मोठी कार्यालये उभारण्याचे नियोजन आहे, ज्यामुळे शिवसैनिकांना सहज संपर्क साधता येईल. या निर्णयावर विरोधकांकडून टीका होत आहे. उबाठा गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, बाळासाहेब ठाकरे यांनी उभारलेल्या शिवसेना भवनाचे पावित्र्य आणि इतिहास वेगळाच आहे.

## कॉकरोच जनता पार्टीला आता शिक्षकांचाही पाठिंबा

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू केलेले आंदोलन आज चौथ्या दिवशीही सुरू आहे. पेपरफुटी, परीक्षेतील अनियमितता आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित इतर मुद्द्यांवर आवाज उठवणाऱ्या या कॉकरोज जनता पार्टीच्या आंदोलनाला काल शेतकऱ्यांनी पाठिंबा दिल्यावर आता शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांकडूनही पाठिंबा मिळत आहे. विविध शिक्षक संघटनाची दुपारी ३ वाजता जंतर-मंतर येथे एकता सभा झाली. यामध्ये देशभरातील अनेक प्रमुख शिक्षक नेते आणि शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले. आयोजकांच्या मते, विद्यार्थ्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेत उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी शिक्षक समुदायही आता उघडपणे या आंदोलनात सामील होत आहे. दरम्यान, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे महासचिव दानिश अली यांनी सांगितले की, आमच्या मागण्यांवर ठोस कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील.

## नसरापूरच्या पीडित कुटुंबाला १० लाखांची मदत मंजूर

**फडणवीसांची लेखी उत्तरात माहिती**

■ मुंबई

**पुणे** जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी विधानसभेत गंभीर चर्चा झाली. या प्रकरणी सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, रोहित पवार आणि इतर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खुलासा मागितला. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात येत असून मनोधैर्य योजनेतून पीडित कुटुंबाला १० लाखांची मदत मंजूर करण्यात आली आहे असे लेखी उत्तरत फडणवीसांनी दिले आहे.



लेखी उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, भीमराव कांबळे (६५) याने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी २ मे २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील राजगड पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला त्याच दिवशी अटक करण्यात आली असून १४ मे २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत असून १६ मे २०२६ रोजी न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक न्यायालयात सुरू असून विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

## 'सॅनफे'च्या त्वचा उजळवणाऱ्या जेलच्या जाहिरातीमुळे वाद

■ नवी दिल्ली

**सॅनफे** या सौंदर्य प्रसाधन कंपनीवर एका त्वचा उजळवणाऱ्या उत्पादनाची जाहिरात केल्याबद्दल टीका होत आहे. या जाहिरातीत एका स्त्रीच्या तोंडी असे वाक्य आहे की, माझ्या पतीने माझ्या काळेपणामुळे मला सोडून एका गोऱ्या स्त्रीशी लग्न केले. त्यावरून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

सॅनफे कंपनीने असे इन्स्टंट टॅन आणि डेड स्किन रिमुव्हल जेल बाजारात आणले आहे, जे मृत त्वचा काढून त्वरित उजळपणा देते. या जेलच्या जाहिरातीत कंपनीने एक स्त्री दाखवली असून, तिच्या पतीने तिला सोडून एका गोऱ्या रंगाच्या स्त्रीशी विवाह केला आहे. त्यामुळे ती 'नैराश्यात' असते. पण सॅनफे जेल वापरताच तिचा रंग गोरा होतो. त्यानंतर तिच्या नवऱ्याला ती परत हवी असते. ती तिच्या पाठीवर जेल लावत असल्याचेही दाखवले आहेत. यावर सोशल मीडिया युजरनी कंपनीला खडसावले आहे. हिमी खंडेलवाल या युजरने म्हटले आहे की, हे २०२६ साल आहे आणि आपण अजूनही महिलांच्या त्वचेचा रंगापुरतेच महिलांचे महत्त्व मानता का? तर काहींनी हे विषारी मार्केटिंग आहे, असे म्हटले आहे.


## व्यावसायिक केतन अग्रवालला होणाऱ्या पत्नीनेच दरीत ढकलले

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ पुणे

**लोणावळ्याजवळील** लोहगड किल्ला येथे ट्रेकिंगदरम्यान पाय घसरून तरुण उद्योजक केतन अग्रवाल (२५) याचा मृत्यू झाला होता. हा मृत्यू म्हणजे हत्या असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी त्याची होणारी पत्नी आणि तिच्या प्रियकराला अटक करण्यात आली आहे.

पुणे ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिया प्रवीण गोयल (२०) आणि चेतन बाबूलाल चौधरी (२२) यांनी मिळून केतनला किल्ल्यावरून दरीत ढकलून त्याची हत्या केली. केतन अग्रवालचे सिया गोयल हिच्याशी लग्न ठरले होते. लग्नापूर्वी १८ जून रोजी दोघे फिरण्यासाठी लोहगड किल्ल्यावर



गेले होते. दुपारी सुमारे दीडच्या सुमारास किल्ल्याच्या पश्चिम बाजूच्या दरीत केतनचा मृतदेह आढळला. सुरुवातीला सियाने पोलिसांना पाय घसरून अपघात झाल्याचे सांगितले होते. त्यानुसार लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

मात्र, घटनेची पार्श्वभूमी संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि कॉल रेकॉर्ड तपासल्यानंतर सियाचे चेतन चौधरीसोबत प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. सियाला केतनसोबत लग्न करायचे नसल्याने आणि तो त्यांच्या नात्यात अडसर ठरत असल्याने दोघांनी मिळून हत्या करण्याचा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## मुस्लीम वैयक्तिक कायद्यात हस्तक्षेप नको समान कायद्याला मुस्लीम समाजाचा आक्षेप

■ भोपाळ

**यूसीसी** म्हणजे समान नागरी संहिता लागू करण्याच्या प्रक्रियेला मुस्लीम प्रतिनिधींनी विरोध दर्शवत मुस्लीम वैयक्तिक कायद्यात कोणताही हस्तक्षेप केल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील, असा इशारा दिला. यूसीसीचा विचार पुढे कधीतरी करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भोपाळ येथील आर.सी.पी. व्ही नरोन्हा प्रशासन व व्यवस्थापन अकादमीमध्ये झालेल्या यूसीसीवरील राज्यस्तरीय बैठकीत विविध धर्मीय प्रतिनिधींनी आपली मते मांडली. मुस्लीम प्रतिनिधी आणि हिंदू उत्सव समिती या दोघांनीही यूसीसीमधील लिव्ह-इन रिलेशनशिपच्या तरतुदीला विरोध केला. त्यांच्या मते ही संकल्पना भारतीय समाजासाठी घातक ठरू शकते. इस्लामिक विद्वान हाझी हरून यांनी यूसीसी आणि मुस्लीम वैयक्तिक कायदा यातील फरक स्पष्ट करताना म्हटले की, वैयक्तिक कायदा संपवण्याची चर्चा का केली जात आहे? उत्तराखंड, गुजरात आणि मध्य प्रदेशातील यूसीसीचे स्वरूप वेगवेगळे असल्याचे सांगत मुस्लीम समाजाचे स्वतःचे विवाहविषयक नियम व परंपरा असल्यामुळे ते यूसीसीला विरोध करतील, असे म्हटले.